जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,


# मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय

अहमदनगर



# क्षितिज

२०१९-२०२०



अ.नगर जिल्हा परिषद अध्यक्षपदी नामदार सौ.राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत प्रा. एस.व्ही. मरकड




८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त महिला गुणगौरव पुरस्कार २०२० प्रसंगी पद्मश्री राहीबाई पोपेरे यांचा सत्कार अ.नगर जिल्हा परिषद अध्यक्षा नामदार सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील व शेवगांव पंचायत समिती सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आला. समवेत सौ. निलिमाताई नरेंद्र घुले पाटील व डॉ. सुधा कांकरिया

Head of Dept. History
Marutrao Ghule Patil
Arts, Comm ... ce College
Ahmednagar


जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

# क्षितिज २०१९-२०

वार्षिक नियतकालिक : अंक चवथा

## संपादक मंडळ



प्रा.डॉ.टी.एम. वराट
संपादक



प्रा.डॉ.किसन रंगनाथ पिसाळ
कार्यकारी संपादक



प्रा.श्रीराम विलास मरकड
सह-संपादक



प्रा.पी.ए. फटांगरे



प्रा.एन.एन. झिंज



प्रा.ए.आय.शेख



प्रा.पी.आर. कुताळ



प्रा.के.बी. ताके



प्रा.एस.बी. दहातोंडे



प्रा.ए.के. आहेर



प्रा. ए.ए. डुचे



प्रा.एस.डी. आवंके



श्री.पी.व्ही. दळवी

# पुणे विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हां अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतो
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर




वार्षिक नियतकालिक २०१९-२०

Online College Code No - C02430
ID No. PU/AN/ACS/111/2009
College Code No. 893
Pun. Code-CAAA017120


## दि प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम ८ फॉर्म नं.४ प्रमाणे आवश्यक माहिती


प्रकाशन स्थळ :
मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर
फोन : ०२४१-२७७९४९७
Email : mgpcollege@gmail.com
website : www.mgpcollege.com

प्रकाशन काल : वार्षिक

राष्ट्रीयत्त्व : भारतीय

प्रकाशक व संपादक :
प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

राष्ट्रीयत्त्व : भारतीय

पत्ता : मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

कार्यकारी संपादक :
प्रा. डॉ. किसन रंगनाथ पिसाळ

राष्ट्रीयत्त्व : भारतीय

पत्ता : मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

मालकी : मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

मुद्रक : लक्ष्मी प्रिंट मिडिया, अ.नगर, मो. ९४०५००१०४७


मी, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट जाहिर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

प्राचार्य डॉ. टी. एम. वराट



हा अंक खाजगी वितरणासाठी आहे. त्यातील मते व्यक्तिगत आहेत व ललित लेखन स्वतंत्र आहे.

# श्रध्देय




## लोकनेते स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील साहेब

(१९३०-२००२)

संस्थापक, अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने
संस्थापक, चेअरमन : श्री. ज्ञानेश्वर सह.सा.का.लि. ज्ञानेश्वरनगर
संस्थापक, अध्यक्ष : श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर

# आधारस्तंभ व प्रेरणास्थान



## मा. आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील

**अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने**
**ता. शेवगाव, जि. अहमदनगर**

# कृतिशील नेतृत्त्व



## मा.आमदार श्री. चंद्रशेखरजी घुले पाटील

सचिव : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने
ता. शेवगाव, जि. अहमदनगर


# मार्गदर्शक



## मा.नामदार सौ.राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील

अध्यक्षा - जिल्हा परिषद अहमदनगर
विश्वस्त - जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने

# आशास्थान



## मा.श्री. डॉ. क्षितिजभैय्या नरेंद्रजी घुले पाटील

विश्वस्त - जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने
तज्ज्ञ संचालक - श्री. ज्ञानेश्वर सह. सा. का. लि. भेंडा
सभापती - पंचायत समिती शेवगाव, जि. अ.नगर



## मा.श्री. के.वाय. नजन

प्रशासकीय अधिकारी

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने




## डॉ. टी.एम. वराट

प्राचार्य

मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अ.नगर

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## विश्वस्त मंडळ


| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ.डॉ.श्री. नरेंद्रजी मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सचिव |
| ३. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | खजिनदार |
| ४. | मा.नामदार सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील | विश्वस्त |
| ५. | मा.डॉ. श्री. क्षितिज नरेंद्र घुले पाटील | विश्वस्त |
| ६. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | विश्वस्त |
| ७. | मा.श्री. शब्बीर छन्नुभाई शेख | विश्वस्त |
| ८. | मा.श्री. मच्छिंद्र बारकू काळे | विश्वस्त |
| ९. | मा.श्री. सुधाकर गवाजी कांबळे | विश्वस्त |

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## महाविद्यालय विकास समिती

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ.डॉ. नरेंद्रजी मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सचिव |
| ३. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | सदस्य |
| ४. | मा.नामदार सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील | सदस्या |
| ५. | मा.डॉ. श्री. क्षितिज नरेंद्र घुले पाटील | सदस्य |
| ६. | मा.श्री. कारभारी यादवराव नजन | सदस्य |
| ७. | मा.डॉ. तुकाराम माणिकराव वराट | सदस्य |
| ८. | प्रा.डॉ. किसन रंगनाथ पिसाळ | शिक्षक प्रतिनिध |
| ९. | प्रा. श्रीराम विलास मरकड | शिक्षक प्रतिनिध |
| १०. | प्रा. पुरुषोत्तम आप्पासाहेब फटांगरे | शिक्षक प्रतिनिध |
| ११. | श्री. प्रविण विष्णु दळवी | शिक्षकेतर सेवक |

# प्राचार्यांचे मनोगत...



प्रिय विद्यार्थी मित्रहो,

आपल्या महाविद्यालयाचा 'क्षितिज' हा चवथा वार्षिक अंक आपल्या हाती देताना मनस्वी खूप आनंद होत आहे. 'शिक्षण' हे समाजपरिवर्तनाचे अत्यंत प्रभावी व उत्तम साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्ती, कुटुंब तसेच समाज यांचा सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास होतो. त्याचबरोबर समाजातील दारिद्र्य, विषमता यांवरचे अंतिम उत्तर म्हणजे माणसाला मिळणारे श्रेष्ठ दर्जाचे शिक्षण होय. या विचाराने प्रेरित होऊन सहकारमहर्षी, लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांनी इ.स. १९५९ साली स्थापन केलेल्या जनता शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या मारूतरावजी घुले पाटील आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालय मी १ जून २०१६ रोजी प्राचार्य या पदावर रूजू झालो. अहमदनगर शहरातील एका नामांकित महाविद्यालयातील ३८ वर्षांच्या प्रदिर्घ सेवेनंतर शिक्षण क्षेत्रातील आपल्या अनुभवाचा उपयोग उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेसाठी करावा असा माझा मानस आहे.

जून २००९ मध्ये स्थापन झालेले हे महाविद्यालय जून २०१७ या शैक्षणिक वर्षापासून स्वतःच्या भव्य, सुसज्ज अशा नवीन इमारतीत स्थलांतरीत झाले आहे. या महाविद्यालयाचे ध्येय आणि उद्दिष्टये म्हणजे समाजातील गरीब, कष्टकरी, कामगार, दुर्बल, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुलामुलींना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून देऊन त्यांना सक्षम, स्वावलंबी व स्वयंपूर्ण करणे ही आहे. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील व संस्थेचे सचिव माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार हे महाविद्यालय यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक दर्जेदार व प्रभावी होण्यासाठी उच्चशिक्षित व अनुभवी प्राध्यापक वर्ग असल्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी व त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी मदत होत आहे. महाविद्यालयामध्ये अध्ययन-अध्यापनाबरोबरच संशोधन, विस्तारकार्य, अभ्यासक्रम पूरक व सहायक उपक्रम तसेच सांस्कृतिक, साहित्यिक, कला, क्रीडा या बाबतच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्याद्वारे विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास व त्यांच्या ज्ञानाची क्षितिजे अधिकाधिक समृध्द, संपन्न व व्यापक करण्यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्न करीत असते.

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक तसेच सर्वांगिण विकास होण्यासाठी महाविद्यालयात विविध विभाग व समित्या कार्यरत आहेत. सांस्कृतिक विभाग, विज्ञान मंडळ, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, वाङ्मय मंडळ अशा विभागांची स्थापना करून त्यांच्याद्वारे विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. याशिवाय राष्ट्रीय सेवा योजना, जयकर व्याख्यानमाला, विद्यार्थी विकास मंडळ याद्वारेही विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविले जाते. तसेच राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करून विद्यार्थी व प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रोत्साहित केले जाते. त्यामुळे प्रत्येकवर्षी विद्यार्थी संख्येचा आलेख वाढत आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विचारांना, भावनांना साहित्यिकदृष्टया व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ आवश्यक असते. त्यासाठी महाविद्यालयाचा वार्षिक शैक्षणिक अंक 'क्षितिज' या नावाने दरवर्षी प्रकाशित केला जातो. या वर्षी २४ मार्च २०२० रोजी कोविड-१९ मुळे महाविद्यालय लॉकडाऊन करावे लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या लेख, कविता, कथा मिळविण्यास खूप अचडणी निर्माण झाल्या. तरीही त्या अडचणीतून मार्ग काढून अंकाचे काम पूर्ण झाले हे विशेष! आपण या अंकाचा स्वीकार कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपणा सर्वांचे सहकार्य आहेच ते वृध्दिंगत होवो हीच मनस्वी सदिच्छा !

**- डॉ. टी. एम. वराट**
प्राचार्य व संपादक

# संपादकीय...



महाविद्यालयातील युवा मनातून साकारलेला 'क्षितिज' नियतकालिकाचा हा चवथा अंक आपल्या हाती सुपूर्त करताना मला विशेष आनंद होत आहे. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र मारूतरावजी घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर मारूतरावजी घुले पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या मौलिक मार्गदर्शनातून या अंकाची निर्मिती झाली आहे. आपण दरवर्षीप्रमाणे या अंकाचे स्वागत कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. मानवी जीवनात ज्ञानाचे महत्त्व खूप मोठे आहे. ज्याला ज्ञानाची आवड नाही. त्याचे जगणे व्यर्थ आहे. ज्ञानाची महती सांगताना संत ज्ञानेश्वर महाराज भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) चवथ्या अध्यायात लिहितात,

**ऐके जया प्राणियाचां ठायीं । इया ज्ञानाची आवडी नाही ।**
**जयाचें जियालें म्हणों काई । वरी मरण चांग ।। ओवी क्र. ९३।।**

विद्यार्थ्यांकडून उपलब्ध झालेला हा साहित्यरूपी ज्ञानाचा ठेवा आपणास नम्रपणे सुपूर्त करीत आहोत. यावर्षी २३ मार्च २०२० रोजी संपूर्ण भारत देशात कोविड १९ मुळे लॉकडाऊन होऊन महाविद्यालयास सुट्टी देण्यात आली. त्यामुळे साहित्य संकलन करताना अडचणी आल्या. तरी 'क्षितिज' अंकाच्या प्रेमापोटी विद्यार्थ्यांनी दिलेल्या कविता, लेख यांचा आस्वाद घेऊन कौतुक करावे. तसेच काही प्राध्यापकांनी अंकासाठी लेख देऊन विचार व्यक्त केले. त्यामुळे अंकाची मौलिकता वाढलेली दिसून येते. या अंकामध्ये साहित्य विश्वाबरोबरच महाविद्यालयात वर्षभर आयोजित केलेल्या शिक्षणपूरक उपक्रमांचा परिचय करून दिला आहे. त्यामुळे महाविद्यालयाशी आपले संबंध अधिक वृध्दिंगत होईल असे मनापासून वाटते.

क्षितिज या चवथ्या वार्षिक अंक निर्मितीसाठी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांनी सतत प्रेरणा व प्रोत्साहन दिले. तसेच महाविद्यालयास सतत सहकार्य करणाऱ्या अहमदनगर जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील व शेवगाव पंचायत समिती सभापती सन्माननीय डॉ. क्षितिज नरेंद्र घुले पाटील यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरले. याशिवाय जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी श्री.के.वाय. नजन यांचे अनमोल सहकार्य मिळाले. तसेच जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त मंडळ, , मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडे, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, भेंडे यांचे सतत सहकार्य मिळत असते. त्याचबरोबर महाविद्यालयास वेळोवेळी मदत व मार्गदर्शन करणारे ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, व्यवस्थापक श्री. अनिल शेवाळे, जनसंपर्क अधिकारी श्री. ल्याणराव म्हस्के, संस्था समन्वयक प्राचार्य डॉ.आर.आर. सासवडे, प्राचार्य डॉ.डी.एन. वाबळे, इंजिनियर श्री. आर.एन. मोटे, श्री. अजय देशमुख, महाविद्यालय विकास समिती या सर्वांचे मी संपादक मंडळाच्यावतीने मनःपूर्वक आभार मानतो.

संपादक मंडळाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे योग्य मार्गदर्शन व अनमोल सहकार्यामुळे अंकाचा दर्जा व लोकप्रियता वाढलेली दिसून येत आहे. तसेच संपादक मंडळातील सदस्य प्रा.एस.व्ही. मरकड, प्रा.पी.ए.फटांगरे, प्रा.एन.एन. झिंज, प्रा.एस. बी. दहातोंडे, प्रा.के.बी. ताके, प्रा.ए.के.आहेर, प्रा.ए.आय. शेख, प्रा. पी.आर. कुताळ, प्रा. ए.ए. डुचे, प्रा.एस.डी. आबक, श्री. पी.व्ही. दळवी याशिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकवृंद या सर्वांचे अनमोल सहकार्य मिळाले. तसेच अंकासाठी साहित्य लेखन देणारे विद्यार्थी व प्राध्यापक या सर्वांसहीत ज्ञात अज्ञात असे ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. त्याचप्रमाणे अंकाची सजावट व मुद्रण करणारे मे.लक्ष्मी प्रिंट मिडिया, अहमदनगर यांच्या ऋणात राहणेच मला अधिक आवडेल.

**– प्रा. डॉ. के.आर. पिसाळ**
कार्यकारी संपादक

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारुतरावजी घुले पाटील कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## प्राचार्य, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवकवृंद

### प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

## कला शाखा

- मराठी विभाग

१. प्रा. डॉ. के. आर. पिसाळ
२. प्रा.डॉ. आर. ए. नेटके

- हिंदी विभाग

१. प्रा. एस. बी. दहातोंडे
२. प्रा.डॉ. एस. ए. काळे

- इंग्रजी विभाग

१. प्रा. पी. ए. फटांगरे
२. प्रा. एस. एन. साबळे

- इतिहास विभाग

१. प्रा. एस. व्ही. मरकड
२. प्रा. श्रीमती जी. एस. सोनवणे

- अर्थशास्त्र विभाग

१. प्रा. श्रीमती ए.आर. पाऊलबुद्धे
२. प्रा. एन.एन. झिंज

- भूगोल विभाग

१. प्रा. एम.एल. कराळे

- राज्यशास्त्र विभाग

१. प्रा. पी.एन. खरड

## वाणिज्य शाखा

वाणिज्य विभाग

१. प्रा. के. बी. ताके
२. प्रा. श्रीमती पी. एस. साबळे
३. प्रा. एन.एम. कडाळे

# विज्ञान शाखा

- **रसायनशास्त्र विभाग**
  १. प्रा. ए. आय. शेख
  २. प्रा. ए. ए. डुचे
  ३. प्रा. श्रीमती बी.एस.पवळे
  ४. प्रा. अे. के. चोपडे
  ५. प्रा. पी.एल. गावडे

- **भौतिकशास्त्र विभाग**
  १. प्रा. एस.डी. आबक
  २. प्रा. पी.बी. लांडे

- **वनस्पतीशास्त्र विभाग**
  १. प्रा. व्ही.एस. पवार
  २. प्रा. सी.बी. पवार

- **प्राणीशास्त्र विभाग**
  १. प्रा. पी.बी. लांडे
  २. प्रा.पी.एम. कुऱ्हाडे

- **गणित विभाग**
  १. प्रा. एफ. बी. खान

- **संगणकशास्त्र विभाग**
  १) प्रा. एच.एस. सय्यद
  २) प्रा. पी.आर. कुताळ
  ३) प्रा.एम.डी. खैरनार
  ४) प्रा.एस.ए. आगरकर


- **क्रीडा विभाग**
  १) प्रा. ए.के. आहेर

- **ग्रंथालय विभाग**
  १) प्रा. एस.पी. शिंदे

## प्रशासकीय सेवकवृंद

| | |
|---|---|
| १. श्री. पी. व्ही. दळवी | मुख्य लिपिक |
| २. श्री. झाडे ए. जी. | लिपिक |
| ३. श्री. एन. बी. शिरसाट | शिपाई |
| ४. श्रीमती एस.आर. वाळके | शिपाई |
| ५. श्रीमती व्ही. एन. उंडे | शिपाई |
| ६. श्री. टी.आर. तेलधुणे | सुरक्षारक्षक |

**Marutraoji Ghule Patil College, Ahmednagar**
**Student Admission Strenth**



जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित


# मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## माजी विद्यार्थी संघ

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. महेंद्र धामणे | अध्यक्ष |
| २ | श्री. सुजित ठोंबरे | उपाध्यक्ष |
| ३ | प्रा. एस. व्ही. मरकड | सचिव |
| ४ | प्रा. बी. एस. पवळे | खजिनदार |
| ५ | श्री. अमोल भवार | सदस्य |
| ६ | वैशाली वाक्चौरे | सदस्य |
| ७ | राकेश वाघ | सदस्य |
| ८ | किशोर धोत्रे | सदस्य |
| ९ | स्वप्नील देठे | सदस्य |

# गुणवंत विद्यार्थी

## कला शाखा



ऋतुजा कदम
प्रथम वर्ष, कला (प्रथम)



सुभाष बाचकर
द्वितीय वर्ष, कला (प्रथम)



आरती ताडे
तृतीय वर्ष कला (प्रथम)

## वाणिज्य शाखा



प्रथमा पठारे
प्रथम वर्ष, वाणिज्य (प्रथम)



राजश्री पंडीत
द्वितीय वर्ष, वाणिज्य (प्रथम)



शितल वाबळे
तृतीय वर्ष, वाणिज्य (प्रथम)

## विज्ञान शाखा



विद्या दरेकर
प्रथम वर्ष, विज्ञान (प्रथम)




सुनिता गोरे
द्वितीय वर्ष, विज्ञान (प्रथम)



श्रध्दा निमसे
तृतीय वर्ष, विज्ञान (प्रथम)

## संगणक विज्ञान शाखा



अशपाक शेख
प्रथम वर्ष,
संगणक शास्त्र (प्रथम)



शबनम शेख
द्वितीय वर्ष
संगणक शास्त्र (प्रथम)



आकाश शर्मा
तृतीय वर्ष,
संगणक शास्त्र (प्रथम)

# गुणवंत विद्यार्थी



प्रा.एस.ए.काळे
हिंदी विषयात पीएच.डी.प्राप्त



मयुरी नरवडे
राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत द्वितीय



सविता नन्नवरे
राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत द्वितीय




अभिषेक मंचरे (FYBSc)
खो-खो स्पर्धेत विभागीय
पातळीवर निवड



अभिषेक चव्हाण
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक



मोनाली पूनम
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक




अमोल कुसमुडे
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक

# अ.नगर महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा
## अ.नगर सहभागी विद्यार्थी



अजय शिरसाठ
(F.Y.B.Com.)



संदिप कांबळे
(F.Y.B.Com.)




स्नेहल भालेराव
(S.Y.B.Com.)



ऋतुजा कदम
(F.Y.B.A.)



तेजस्विनी पवार
(F.Y.B.C.S.)



शुभम पाडळे
(F.Y.B.C.S.)




मयुर गायकवाड
(F.Y.B.C.S.)




प्राजक्ता शिंदे
(S.Y.B.S.C.)

# मान्यवरांच्या भेटी




महाविद्यालयात सायन्स असोसिएशन विज्ञान दिनानिमित्त स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सर्जेराज निमसे यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट समवेत विज्ञानशाखा विभाग प्रमुख प्रा.अे. आय.शेख



जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव ने प्रशासकीय अधिकारी म्हणुन श्री. के.वाय.नजन यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम.वराट समवेत प्राचार्य डॉ.डी.एन.वाबळे, प्राचार्य डॉ.आर. आर. सासवडे, व प्राध्यापकवृंद



शिवजंयती उत्सवा निमित्त प्रमुख पाहुणे जिजामाता महाविद्यालय, भेंडा येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. नारायण म्हस्के यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व इतर मान्यवर



१५० वी महात्मा गांधी जयंती निमित्त महात्मा गांधी अध्ययन केंद्राचे समन्वयक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, प्रा.डॉ. अनिल कवडे, अ.नगर कॉलेज अ.नगर यांचा सत्कार करताना प्राचार्य समवेत प्रा.डॉ. शरद बोरुडे व प्रा.काळे



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्यावतीने दिला जाणारा गुणवंत प्रशासकीय सेवक पुरस्कार २०२० मा.श्री. शिवाजी साबळे यांना मिळाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम.वराट समवेत प्रा.डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे

# विविध उपक्रम



जिजामाता महाविद्यालय भेंडा येथील प्राचार्य डॉ.बी.जे. अप्पाराव यांचा निवृत्त झाल्याबद्दल सपत्नीक सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



शेवगाव पंचायत समिती सभापती व संस्था विश्वस्त डॉ. क्षितिज घु पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना प्राचार्य डॉ.टी.एम. वरा



शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाविद्यालय प्रांगणात रोपवाटीकेचे उद्घाटन करताना प्रा.डॉ. आनंद पंडीत, भूगोल विभाग प्रमुख, न्यु आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अ.नगर, प्राचार्य व प्राध्यापकवृंद




वरद इंडस्ट्रिज आयोजित योग व ध्यान शिबीर कार्यक्रम प्रसंगी मा.श्री. जितेंद्र रसाळकर यांचा सत्कार करताना मराठी विभाग प्रमुख, प्रा.डॉ. के. आर. पिसाळ





शिवजंयती उत्सव कार्यक्रमात २५ फूट शिवप्रतिमेवर फुलांचा वर्षाव करताना महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी



Axis Bank Sales Officer या पदासाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले असता मार्गदर्शन करताना ब्रँच मॅनेजर श्री. हर्षल कुल समवेत प्रा. एस. बी. दहातोंडे


# विविध उपक्रम




अहमदनगर महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत 'लॉटरी' या एकांकिकेस पारितोषिक मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करताना अ.नगर म.न.पा. नगरसेवक डॉ. सागर बोरूडे, प्राचार्य डॉ.आर.आर. सासवडे व प्राचार्य




१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीपर गीत सादर करताना प्रा. पूनम खरड, राज्यशास्त्र विभाग प्रमुख व विद्यार्थीनी



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पाचव्या पदवीग्रहण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे स्व.रा.ती.म. विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर, प्राचार्य डॉ. डी.एन. वाबळे, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, परीक्षा अधिकारी प्रा.पी.ए.फटांगरे व प्रा. एस.व्ही. मरकड



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पाचव्या पदवीग्रहण समारंभ प्रसंगी पदवी प्रमाणपत्र स्वीकारल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी समवेत प्राचार्य व परीक्षा अधिकारी प्रा.पी. ए. फटांगरे व प्रा. मरकड




आर्ट ऑफ लिव्हिंग कार्यक्रम प्रसंगी प्रा.नरेंद्र बोठे यांचा सत्कार करताना कला शाखा प्रमुख प्रा. एस.व्ही. मरकड समवेत प्रा.डॉ. के.आर.पिसाळ



अहमदनगर आकाशवाणी कार्यक्रमात हिंदी दिना निमित्त मुलाखत देताना हिंदी विभाग प्रमुख, प्रा. एस.बी. दहातोंडे

# विविध उपक्रम



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण प्रसंगी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.आर. आर. सासवडे, प्राचार्य, प्राध्यापकवृंद, पालक व विद्यार्थी




२६ जानेवारी २०२० प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्र ध्वजास मानवंद
देताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी व विद्यार्थी




संस्थेचे सचिव मा. आमदार चंद्रशेखर घुले पाटील साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त वृक्षारोपण करताना संगणक विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकवृंद




राजर्षी शाहु महाराज महाविद्यालय देवळाली प्रवरा येथे पदवीग्रहण समा
प्रसंगी पदवीदान करताना प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, प्राचार्य डॉ. स्वा
हापसे व मान्यवर




ध्यान व योग शिबीर प्रसंगी श्री. जितेंद्र रसाळकर, योग धारणेचे प्रात्याक्षिक करताना महाविद्यालयातील विद्यार्थी व समन्वयक प्रा.अे.आय. शेख



राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत 'लॉटरी' एकांकिका सादर करतान
महाविद्यालयातील विद्यार्थी एक क्षण

# विविध उपक्रम



राष्ट्रीय सेवा योजना उद्‌घाटन प्रसंगी रा.से.यो.चे महत्त्व विशद करताना संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील साहेब समवेत सरपंच प्रा. भाऊसाहेब सावंत व इतर मान्यवर



रसायनशास्त्र विभाग आयोजित शैक्षणिक सहलीत भेंडा येथील कृषि विज्ञान केंद्रास भेट दिली असता रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ए.आय.शेख, प्रा. अनिता चोपडे, प्रा. डॉ.के.आर. पिसाळ व विद्यार्थी



वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना बँक व्यवहारातील साधनांविषयी प्रात्यक्षिकांसहीत माहित दिल्यानंतरचा एक क्षण समवेत विषय शिक्षक प्रा. के.बी. ताके (वाणिज्य विभाग)



शिवजंयती उत्सव प्रसंगी प्रतिमापूजन करताना प्रमुख पाहुणे जिजामाता महाविद्यालया, भेंडा येथील इतिहास विभाग प्रमुख, प्रा.डॉ. नारायणराव म्हस्के, शिव व्याख्याते प्रा. संतोष विरकर, प्रा. डॉ.एच.एस. तनपुरे समवेत प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी.




सांस्कृतिक विभाग व १०४ माय एफ.एम. आयोजित माय कॅम्पस स्टार्स स्पर्धा प्रसंगी आर.जे. सुमित यांचा सत्कार करताना प्रा.डॉ. टी.एम.वराट




ब्रिलीयंट कॉम्प्युटर बर्ड चॅम्पियनशिप अहमदनगर स्पर्धेत संगणक विभागातील सहभागी विद्यार्थी व प्रा. एन.डी.खैरनार (संगणक विभाग)


# विविध उपक्रम




८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील महिला गुणगौरव सोहळ प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील समवेत मा.राहिबाई पोपेरे व गुणवंत महिला



महाविद्यालय वाणिज्य विभागातील प्रात्यक्षिक परीक्षेस परीक्षक न्यु आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अ.नगर येथील डॉ.कळमकर व प्रा.डॉ. अडसुरे समवेत प्रा.के.बी.ताके व प्रा. साबळे




रसायनशास्त्र विभाग आयोजित भेंडे येथील माती व पाणी परीक्षण केंद्रास भेट दिली असता मार्गदर्शन करताना मा.श्री. भास्कर ताकटे



गुरू पौर्णिमेनिमित्त प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांना पुष्पगुच्छ देऊन करताना वाणिज्य शाखेतील विद्यार्थी समवेत प्रा. एफ.बी.खान, प्रा. फटांगरे, प्रा. एस.एन. साबळे



५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व विद्यार्थी शिक्षक



जागतिक एडस् दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हा रुग्णालय येथील डॉ. भक्ती म्हस्के व मान्यवर


# दिन विशेष कार्यक्रम



८ मार्च जागतिक महिला दिनांनिमित्त गुणवंत महिलांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अ.नगर जिल्हा परिषद अध्यक्षा नामदार सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील, शेवगाव पं.सं. सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील, सौ. निलिमाताई नरेंद्र घुले पाटील व महाविद्यालयीन विद्यार्थीनी



२७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'मराठी भाषेविषयी माहिती देताना न्यु आर्टस कॉलेज, अ.नगर येथील मराठी विभाग प्रमुख, प्रा.डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे, प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. के.आर. पिसाळ



भूगोल दिनानिमित्त प्रतिमापूजन करताना प्रा.डॉ. आनंद पंडीत, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, भूगोल विभाग प्रमुख प्रा.एम. एल. कराळे व प्रा. एस.व्ही. मरकड



संस्थेचे संस्थापक स्व. लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांच्या १७ वे पुण्यस्मरण दिनानिमित्त अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी. एम. वराट व प्राध्यापकवृंद



विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन आयोजित केले असता प्रमुख पाहुणे मा. कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे यांच्या शुभहस्ते पारितोषिक स्वीकारताना कु. सविता नन्नवरे समवेत प्राचार्य व प्रा.अे.आय. शेख



महाविद्यालयात वेषभूषा दिन साजरा करताना महाविद्यालयीन विद्यार्थीनी व विद्यार्थी समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट

# दिन विशेष कार्यक्रम




राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रतिमापूजन करताना माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, प्राचार्य डॉ.टी. एम.वराट, विज्ञान शाखा प्रमुख प्रा.ए.आय.शेख, परीक्षा अधिकारी प्रा.पी.ए. फटांगरे व प्रा.डॉ. के.आर. पिसाळ



सांस्कृतिक विभाग आयोजित महाविद्यालयात 'साडी डे' साजरा करता महाविद्यालयीन विद्यार्थीनी समवेत प्राचार्य डॉ.टी.एम.वराट



१९ फेब्रुवारी शिवजयंती उत्सवानिमित्त 'शिवाजी महाराजांचे विचार व धोरण' या विषयावर मार्गदर्शन करताना शिवशाहीर प्रा. संतोष वीरकर (औरंगाबाद) समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्रा.डॉ. नारायण म्हस्के, प्रा.डॉ. एच.एस.तनपुरे व प्रा. एस.व्ही. मरकड



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती दिनानिमित्त प्रतिमापूजन करताना सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एन.एन. झिंज, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी



१५ सप्टेंबर भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या जयंती तथा अभियंता दिनानिमित्त आयोजित कौशल्य विकास उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थीनी समवेत प्राचार्य, श्री.पी.व्ही. दळवी (O.S.) व प्राध्यापकवृंद



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त बारामती येथील आयोजित कृषिक प्रात्यक्षि व कृषि प्रदर्शनास भेट दिली असता प्रा.एस.डी. अबक, प्रा.एस. एल लांडे व प्रा.एम. एल. कराळे व शास्त्र शाखेतील विद्यार्थी

# शैक्षणिक सहल



वेरूळ येथील जग प्रसिध्द  कैलास लेणी, शिल्पकला, स्थापत्यकला आदी गोष्टी पाहताना शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यानी अनुभवलेला एक क्षण



जुन्नर तालुक्यातील खोडद येथील पॅराबोलिक ताराच्या स्वरूपातील दुर्बिणीस शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांनी भेट दिली असता एक क्षण



छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी किल्ल्यास भेट देऊन शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी अनुभवलेला एक अविस्मरणीय क्षण



मराठवाड्याचे महाबळेश्वर म्हणुन प्रसिध्द असलेले औरंगाबाद जवळील निसर्गरम्य थंड हवेचे ठिकाण म्हैसमाळ येथे भेट दिली असता इतिहास विभाग प्रमुख, प्रा.एस.व्ही. मरकड व भूगोल विभाग प्रमुख, प्रा. एम.एल. कराळे, प्रा.पी. ए. फटांगरे व विद्यार्थी



संगणकशास्त्र विभाग आयोजित औरंगाबाद येथील ऐतिहासिक 'बिबिका मकबरा' या ठिकाणास भेट दिली असता प्रा.एच. एस. सय्यद व संगणकशास्त्र शाखेतील विद्यार्थी



कलाशाखा व संगणकशास्त्र शाखा आयोजित शैक्षणिक सहलीत सहभागी झालेले विद्यार्थी व विद्यार्थीनी एक क्षण

# बहि:शाल शिक्षण केंद्र माती व पाणी परीक्षण कार्यशाळा



एक दिवसीय माती व पाणी परीक्षण कार्यशाळेचे उद्घाटन करताना शेतीतज्ज्ञ डॉ. मधुकर हेगडे, मा. प्राचार्य डॉ. एस.टी. लवांडे, प्राचार्य डॉ. आर.आर. सासवडे, प्राचार्य डॉ.टी. एम. वराट व केंद्रवाहक प्रा.जी. एस. सोनवणे




'एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळेप्रसं शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. ए.बी. कडलग समवेत प्राचा डॉ.के.के. देशमुख व प्राचार्य डॉ.टी. एम. वराट




एक दिवसीय माती व पाणी कार्यशाळा प्रसंगी प्राचार्य डॉ.के.के. देशमुख यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत डॉ. ए.बी. कडलग



एक दिवसीय माती व पाणी कार्यशाळेप्रसंगी स्नेह भोजनाचा आस्व घेताना महाविद्यालय परिसरातील शेतकरी

# एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक शिबीर



एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक शिबीर उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सौ. कुसुम जिवडे समवेत प्रमुख वक्ते मा. प्राचार्य श्रीधर दास, प्रा.श्री. सुरेंद्र गुजराथी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.टी. एम. वराट



ज्येष्ठ नागरिक शिबीर प्रसंगी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना स्वखर्च प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी 'तुकाराम गाथा' या ग्रंथाच्या ५० प्र भेट दिल्या यावेळी टिपलेला एक क्षण

# लोकनेते मारुतरावजी घुले पाटील जयंती कार्यक्रम



लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांच्या ८९ व्या जयंती निमित्त रांगोळी, पोस्टर्स आदी स्पर्धांचे उद्‌गाटन करताना मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष व प्राचार्य डॉ. अशोक शिंदे व ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत श्री. रवींद्र मोटे (इंजिनियर) व प्राध्यापकवृंद



लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांच्या ८९ व्या जयंती निमित्त प्रतिमापूजन करताना ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष व प्राचार्य डॉ. अशोक शिंदे, प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एन. एन. झिंज



स्व. मारूतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून पोस्टर्स प्रेझेंटेशन स्पर्धेचे परीक्षण करताना मा.श्री. काकासाहेब शिंदे (जनरल मॅनेजर) श्री. रवींद्र मोटे (सिव्हिल इंजि.), प्राचार्य व प्रा. एन.एन.झिंज



लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांच्या जयंती निमित्त साहेबांचे जीवन व कार्य या विषयी माहिती देताना मा.श्री. काकासाहेब शिंदे व मान्यवर



स्व. मारूतरावजी घुले पाटील साहेब यांच्या विषयी आठवणींना उजाळा देताना मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष व प्राचार्य डॉ. अशोक शिंदे



लोकनेते मारूतरावजी घुले पाटील जयंती निमित्त रांगोळी स्पर्धेचे परीक्षण करताना जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. अशोक शिंदे, प्राचार्य डॉ.टी.एम.वराट, इंजि. श्री.रवींद्र मोटे व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एन.एन. झिंज

# विशेष व्याख्यानमाला



रा.से.यो. व राज्यशास्त्र विभाग आयोजित राष्ट्रपिता महात्मा गांधी सुवर्णशताब्दी जयंती निमित्त महात्मा गांधी जीवन व कार्याविषयी माहिती देताना महात्मा गांधी अध्ययन केंद्र समन्वयक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिल कवडे (अ.नगर कॉलेज,अ.नगर), समवेत प्राध्यापवृंद



विशेष मार्गदर्शन योजने अंतर्गत अर्थशास्त्र या विषयावर मार्ग देण्यासाठी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व उपप्राचार्य प्रा संभाजी काळे (जिजामाता महाविद्यालय, भेंडा) आले असता स करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत प्राध्यापकवृंद



महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थीनींना 'सुरक्षितता' या विषयावर मार्गदर्शन करताना पी.एस. आय. कल्पना चव्हाण समवेत प्राचार्य, समिती प्रमुख प्रा.अे.आर. पाऊलबुध्दे व इतर मान्यवर



छत्रपती शिवाजी महाराज जीवन व कार्य या विषयावर मार्गदर्शन करत इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. नारायणराव म्हस्के (जिजाम महाविद्यालय, भेंडा ) समवेत प्राचार्य व मान्यवर



अॅड. एम.एन. देशमुख महाविद्यालय, राजुर येथे विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित 'पोवाडा एक लोककला' या विषयावर व्याख्यान देण्यास गेले असता प्रा.डॉ. के.आर.पिसाळ यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. देशमुख व प्राध्यापकवृंद



वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना C.A.CS,ICA या विषयी मार्गदर्श करताना प्रा. विपुल कटारिया (ICA Institute, Ahmednagar)

# नॅक अहवाल तयारी मार्गदर्शन सामजस्य करार (MOU)




यु.जी.सी.नॅक परामर्श स्किम प्रोग्राम अंतर्गत नॅक संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. मनोज सत्तीगेरी (संचालक सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, पुणे) आले असता त्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



नॅक क्राईट एरिया 1 संदर्भात प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. अपूर्वा कुलकर्णी (S.I.U)




नॅक क्राईट एरिया 2 संदर्भात माहिती देताना प्रा.डॉ. परिमला वेलुवाली समवेत मुर सावसानी, प्राचार्य डॉ.टी.एम वराट व प्रा.डॉ. पिसाळ



भैरवनाथ विज्ञान महाविद्यालय, खुटबाव ता. दौंड, जि. पुणे येथे या महाविद्यालयास नॅक 'बी' ग्रेड मिळाल्याबद्दल भेट देण्यासाठी गेलो असता सहसचिव सूर्यकांत खैरे, प्राचार्य डॉ. अविनाश सांगोलेकर, प्राचार्य, व नॅक समितीतील सदस्य




महाविद्यालयाने नॅक संदर्भात केलेल्या पूर्वतयारी विषयी माहिती देताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत प्रा.डॉ. अनिकेत जगताप, अपूर्वा कुलकर्णी व नॅक समन्वयक प्रा.के.बी.ताके



मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय व सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ (MOU) नॅक संदर्भात करार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट

# राष्ट्रीय सेवा योजना



शै. वर्ष २०१९-२० राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन प्रसंगी प्रतिमापूजन करताना प्रा.डॉ. किशोर धनवटे (ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा) प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.ए. काळे, प्रा. एम.एल. कराळे व प्रा.बी.एस. पवळे



तीन महाविद्यालयाने एकत्रित येऊन आयोजित केलेल्या राष्ट्रीय से योजना विशेष हिवाळी शिबीर चिलेखनवाडी उद्घाटन प्रसंगी प्रशासकी अधिकारी श्री. के.वाय.नजन, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्रा.डॉ.डी.ए वाबळे, प्राध्यापक व रा.से.यो. स्वयंसेवक विद्यार्थी



रा.से.यो. उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ. नरेंद्र घुले पाटील साहेब व माजी आमदार श्री. पांडुरंग अभंग साहेब यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व इतर मान्यवर



रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन प्रसंगी इलेक्ट्रॉनिक मिडि शेवगाव तालुका अध्यक्ष पत्रकार श्री. अशोक वाघ यांचा सत्कार करत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत प्रशासकीय अधिकारी श्री. के.वा नजन, प्राचार्य डॉ.डी.एन.वाबळे, पत्रकार शंकर मरकड व मान्यवर



रा.से.यो. विशेष हिवाळी शिबीर चिलेखनवाडी येथे वृक्षारोपणासाठी खड्डे खोदताना रा.से.यो. स्वयंसेवक विद्यार्थी



'स्वच्छता हिच सेवा' या उपक्रमा अंतर्गत चिलेखनवाडी ये ग्रामस्वच्छता करताना रा.से.यो. विद्यार्थी व विद्यार्थीनी



रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. देसाई देशमुख आबा समवेत सरपंच प्रा. भाऊसाहेब सावंत व इतर मान्यवर



रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी उत्कृष्ट स्वयंसेवक अभिषेक चव्हाण याचा सत्कार करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. देसाई देशमुख आबा, उद्योजक बी.डी. पुरी साहेब, सरपंच व इतर मान्यवर

# क्रीडा विभाग



शेवगाव न्यु आर्टस् कॉलेज येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत सहभागी झालेले महाविद्यालयातील विद्यार्थी एक क्षण



प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान शारीरिक शिक्षण परीक्षा संबंधी विद्यार्थ्यांना 'क्रीडा मानसशास्त्र' या विषयी मार्गदर्शन करताना डॉ. शरद मगर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख (न्यु आर्टस् कॉलेज, अ.नगर) समवेत क्रीडा मार्गदर्शक प्रा. ए.के. आहेर, प्रा. लाटे व डॉ. पिसाळ



सी.डी. जैन महाविद्यालय, श्रीरामपूर येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत ५६ किलोग्रॅम गटात सहभागी झालेला महाविद्यालयाचा विद्यार्थी सुरज शिवाजी गुंजाळ (F.Y.BSC)




न्यु आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेमध्ये सहभागी झालेले महाविद्यालयातील विद्यार्थी

# माजी विद्यार्थी मेळावा



माजी विद्यार्थी मेळावा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट, माजी विद्यार्थी संघ प्रमुख प्रा.एस.व्ही. मरकड, प्रा.एम.एल.कराळे, प्रा.एच.एस. सय्यद, प्रा.एस.बी. दहातोंडे व माजी विद्यार्थी




कॅम्पस मुलाखत प्रसंगी माजी विद्यार्थ्यांना ‘नोकरीच्या संधी’ विषयावर मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट

# स्पर्धा परीक्षा केंद्र



युनिक ॲकॅडमी प्रमुख मार्गदर्शक प्रा. नारायणराव पाटील यांचा स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने सत्कार करताना कला शाखा प्रमुख प्रा.एस.व्ही. मरकड



स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन पी.एस.आय. मनिषा शिंदे यांच्या शुभह करण्यात आले. या प्रसंगी त्यांचा सत्कार करताना प्राचा डॉ.टी.एम.वराट समवेत प्रा. मोहिनी शिंदे

# पालक मेळावा



पालक मेळावा प्रसंगी पालकांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले समवेत संस्थेचे समन्वयक प्राचार्य डॉ.आर.आर. सासवडे, प्राचार्य, पालक व प्राध्यापवृंद



पालक मेळावा प्रसंगी स्नेहभोजनाचा आस्वाद घेताना टिपलेला एक क्ष


# शैक्षणिक सुविधा व परिसर क्षणचित्रे




मुख्य इमारत




पार्किंग व्यवस्था




संगणकशास्त्र प्रयोगशाळा



ग्रंथालय




रसायनशास्त्र प्रयोगशाळा



वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळा



प्राणीशास्त्र प्रयोगशाळा




भौतिकशास्त्र प्रयोगशाळा

# शैक्षणिक सुविधा व परिसर क्षणचित्रे



वनस्पतीशास्त्र उद्यान



निसर्गरम्य परिसर

# विद्यार्थी पोस्टर्स व रांगोळी आविष्कार






# गद्य विभाग

# गद्य विभाग

| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १ | लोकनेते मारूतरावजी घुले पाटील | प्रा. के बी. ताके |
| २ | सावित्रीबाई फुले | संजु दशरथ पाल |
| ३ | वाचन संस्कृती | मयुरी शरद नरवडे |
| ४ | स्त्री भ्रूण हत्या : एक विचार | भाग्यश्री राख |
| ५ | पद्मश्री पोपटरावजी पवार | ऋषिकेश सुरेश काळे |
| ६ | बंकिमचंद्र चटर्जी | उमावती त्रिंबक पवार |
| ७ | संत निळोबाराय | प्रा.डॉ. के. आर. पिसाळ |
| ८ | आजची तरूण पिढी | प्रीती आनंद जाधव |
| ९ | आजची स्त्री खरंच स्वतंत्र आहे का ? | तेजस्विनी पवार |
| १० | जॉर्ज स्टिफन्सन | आरती बाबासाहेब ताडे |
| ११ | कोरोनाचा भारत देशावर झालेला परिणाम | प्रविण विष्णु दळवी |
| १२ | जिंदगी | माधुरी इटकर |
| १३ | Eye Donation - A Gift of beauty | निकिता तांगडे |
| १४ | Carrer in Computer Science | शबनम शेख |
| १५ | Akira Yoshina | कोरी रवी मेवालाल |
| १६ | Pleasure of Reading | प्रीती बाळासाहेब काटे |
| १७ | Life of Science Student | पूजा बाळासाहेब सूर्यवंशी |

# लोकनेते मारूतरावजी घुले पाटील

समाजातील कुठल्याही व्यक्तीचे कार्य जाणून घ्यायचे असेल तर त्या व्यक्तीने वैयक्तिक विचार न करता समाजातील प्रत्येक घटकाचा विकास होण्यासाठी केलेले कार्य महत्त्वाचे असते. अशा समाजाचा विकास होण्यासाठी सहकार महर्षी, ग्रामविकासाचे शिल्पकार लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांनी प्रयत्न केले. मारूतरावजी घुले पाटील यांचा जन्म श्रीरामपूर तालुक्यातील पडेगाव येथे १५ सप्टेंबर १९३० रोजी झाला. त्यांचे संपूर्ण नाव विश्वनाथ दादापाटील बनकर होते. लहानपणापासून त्यांना समाजसेवेची विशेष आवड होती. दहिगाव ने येथील शंकरराव घुले पाटील यांनी त्यांना दत्तक घेतले व त्यांचे नाव मारूतरावजी घुले पाटील असे झाले. मारूतरावजी घुले पाटील यांच्यावर यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा विशेष प्रभाव होता. सामान्य माणूस विकासाचा केंद्रबिंदू मानून आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी लोककल्याणासाठी खर्ची घातले. ग्रामीण भागाला वीज, पाणी, शेती, आरोग्य, उद्योग व सहकार या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केला. आपल्यामध्ये असलेली बुद्धिमत्ता, उदारता, चातुर्य, प्रामाणिकपणा, जिद्द व चिकाटी या गुणांच्या बळावर त्यांनी समाजाचा कायापालट केला.

**''मेरे देश की धरती, सोना उगले**
**उगले, हिरे मोती, मेरे देश की धरती '**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतात शेतीला सोन्याइतके महत्त्व आहे. शेतकरी सुखी तर जग सुखी. कारण शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. मारूतरावजी घुले पाटील हे शेतकरी असल्यामुळे शेती क्षेत्रातील विशेष जाण त्यांना होती. शेतकऱ्यांनी पिकविलेल्या मालाला चांगला भाव व बाजार उपलब्ध झाला पाहिजे. या प्रेरणेतून सुरु केलेला ज्ञानेश्वर सहकारी कारखाना हे एक आदर्श उदाहरण आहे. महाराष्ट्रात साखर उत्पादनात हा कारखाना अग्रेसर आहे. तसेच जायकवाडी धरणाचा उपयोग हा तालुक्यातील जनतेसाठी व मराठवाड्यासाठी व्हावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ असताना दहिगाव ने परिसरामध्ये पाण्याची कमतरता पडत नाही. यामागे मारूतरावजी घुले पाटील यांची दूरदृष्टी होती. जिल्हा सहकारी बँकेमार्फत शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्जपुरवठ्याची सोय करून कृषी क्षेत्रामध्ये विकास घडून आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यात सहकाराच्या माध्यमातून औद्योगिक क्रांती घडविण्यात मारूतरावजी घुले पाटील यांचे मोलाचे योगदान आहे.

**विद्येविना मती गेली । मती विना निती गेली ।**
**नीतीविना गती गेली । गतिविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शुद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

या ओळी प्रमाणे शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. समाजातील लोकांचा विकास करायचा असेल तर त्यांना योग्य व चांगले शिक्षण मिळणे आवश्यक आहे. पूर्वी ग्रामीण भागातील मुले तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन शिक्षण घेऊ शकत नव्हते. या हेतूने मारूतरावजी घुले पाटील यांनी समाजातील विविध घटकातील मुलामुलींना शिक्षणाची सुविधा प्राप्त व्हावी म्हणून ६ जून १९५९ साली जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. त्यानंतर त्यांनी नवजीवन माध्यमिक विद्यालय व वसतिगृहाची सुरुवात करून शिक्षणाचे पवित्र कार्य सुरु केले.

**'इवलेसे रोप लावियेले द्वारी,**
**तयाचा वेलू गेला गगनावरी'**

या अभंगाप्रमाणे त्यांनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आज संस्थेची प्राथमिक ३, माध्यमिक व उच्च माध्यमिक १४

तसेच ३ वरिष्ठ महाविद्यालये सुरु आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कृषी विज्ञान केंद्र, पब्लिक स्कूल, नर्सिंग स्कूल, कृषी तंत्र विद्यालय असे अनेक अभ्यासक्रम यातून शिकवले जात आहेत. अहमदनगर एमआयडीसी परिसरातील शेतकरी व काम करणाऱ्या मुलांची शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टिकोनातून अहमदनगर बोल्हेगाव येथे आपले महाविदयालय सुरु केले. आजची परिस्थिती पाहिली तर महाविद्यालयातील ७०% विद्यार्थी काम करून शिक्षण घेतात. समाजातील दुर्बल, वंचित, गोरगरीब, कष्टकरी आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुला-मुलींची उच्चशिक्षणाची सोय करून त्यांना स्वालंबी, सक्षम, सबल करणे हा हेतू ठेवून शैक्षणिक कार्य केले.

मारूतरावजी घुले पाटील यांचे राजकीय गुरू यशवंतराव चव्हाण साहेब व भारताचे माजी कृषी, संरक्षण मंत्री व महाराष्टाचे माजी मुख्यमंत्री आदरणीय शरद पवार साहेब यांचा विशेष प्रभाव त्यांच्यावर होता. शरद पवार यांनी काँग्रेस पक्षासोबत फारकत घेऊन पुलोदचे सरकार स्थापन केले. त्यावेळी ते त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. राजकारणामध्ये एकनिष्ठता व पक्षनिष्ठता हे त्यांचे विशेष गुण त्यांच्या कुटुंबात आजही आहेत. आजचे राजकीय वातावरण पाहिले तर ज्या पक्षाची सत्ता आहे त्या पक्षात लोक पक्षांतर करत असतात. पण मारूतरावजी घुले पाटील हे आपल्या कामाशी प्रामाणिक व एकनिष्ठ असल्यामुळे इ.स. १९६२ साली शेवगाव-नेवासा मतदार संघातून आमदार म्हणून निवडून गेले. तसेच १९७२-७८ पर्यंत ते विधानसभा व विधान परिषदेवर आमदार होते. शरद पवार 'लोक माझे सांगाती' या त्यांच्या आत्मचरित्रामध्ये म्हणतात, ''माझ्या प्रत्येक निर्णयामध्ये मारूतरावजी घुले पाटील हे माझ्या पाठीशी कायम असणारे व्यक्तिमत्त्व होते.''

अतिशय सामान्य कुटुंबातून खडतर जीवन जगुन मारूतरावजी घुले पाटील यांनी आपला जीवन प्रवास केला. त्यांची सामाजिक व सहकाराप्रतीची निष्ठा सर्वानाच भावली. रूबाबदार व्यक्तिमत्त्व शब्दातील वजन व करारी दृष्टी यामुळे पाहताक्षणीच इतरांपेक्षा त्यांचे वेगळे व्यक्तिमत्त्व दिसत असे. पुरोगामी विचारांची सांगड समाजाप्रती बांधिलकी, सामान्य हिताचे निर्णय कसे राबवतात यांचे कसब त्यांच्याकडे होते. म्हणून सर्वसामान्य माणूस विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य लोकल्याणासाठी खर्ची घातले. जायकवाडी हे आशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण असल्याने धरणाखाली गेलेल्या जमिनी व विस्थापितांसाठी पुर्नउभारणीचे कार्य केले. ताजनापूर प्रकल्प तसेच धरणग्रस्त शेतकरी यांच्यासाठी विशेष प्रयत्न करून कार्यकारी सेवा खरेदी विक्री केंद्र सुरु केले. शेवगाव व परिसरातील मुलांना रोजगार मिळावा यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, १९७० मध्ये ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना अशा संस्थाची स्थापना करून अनेक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन १९५४ साली इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार तसेच भारतीय उद्योगरत्न पुरस्कार (१९९६) व जिल्हा बँकेचा सहकार भूषण पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले.

सहकार महर्षी मारूतरावजी घुले पाटील हे समाजासाठी शिक्षण, कृषी, उद्योग आदी सामाजिक योगदान देत असताना ८ जुलै २००२ रोजी त्यांनी जगाचा अखेरचा निरोप घेतला. असा महान लोकनेता आज आपल्यात नाही परंतु त्यांनी केलेली कामे त्यांच्या स्मृतीची साक्ष व प्रेरणा देत सदैव उभी आहेत. त्यांच्या कार्यास व त्यांना विनम्र अभिवादन !

**- प्रा.के.बी. ताके**
वाणिज्य विभाग

# सावित्रीबाई फुले

सातारा जिल्ह्यातील नायगाव या गावी ३ जानेवारी १८३१ रोजी सावित्रीबाईंचा जन्म झाला. आईचं नाव लक्ष्मीबाई तर गावचे पाटील असणाऱ्या वडिलांचे नाव रंकोजी नेवसे पाटील होते. स्त्री स्वातंत्र्य औषधालाही माहित नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. पण बंधनाचा अर्थच त्या वयात कळत नाही; त्या वयापासूनच त्यांनी आपल्या कार्याला त्यांच्याही नकळत सुरुवात केली होती. एका दुबळ्या मुलाचे फूल हिसकावून घेणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडविली होती. तर पक्ष्यांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले.

इ.स. १८४० रोजी ज्योतीराव फुले यांच्याशी सावित्रीबाईंचा विवाह झाला. लग्नाच्या वेळी सावित्रीबाईंचे वय नऊ, तर ज्योतिरावांचे वय तेरा वर्षाचे होते. म्हणजे त्या वेळी त्या रूढीनुसार लग्नाला उशीरच झाल्याचे मानले गेले. सावित्रीबाईंचे सासरे गोविंदराव फुले हे मुळचे फुरसुंगीचे क्षीरसागर होते. पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुल बागेची जमीन बक्षीस दिली म्हणून ते पुण्याला येऊन राहिले व फुलांच्या व्यवसायावरून त्यांना फुले हे आडनाव मिळाले.

सावित्रीबाईंचे पती ज्योतिराव यांना लहानपणापासूनच मातृप्रेम लाभले नाही. त्यांची मावस बहीण सगुणा-आऊ यांनीच त्यांचा सांभाळ केला. सगुणा एका इंग्रज अधिकाऱ्यांच्या मुलाच्या दाई म्हणून काम करायच्या. त्यांना इंग्रजी कळायचं व बोलताही यायचं. त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग ज्योतिरावांना प्रेरित करण्यासाठी केला. ज्योतिरावही शिक्षणाकडे आकर्षित झाले. सावित्रीबाईंना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लग्नापूर्वी दिलेले एक पुस्तक त्या सासरी घेऊन आल्या होत्या.

'त्यांनी करेल ते माफ आणि आपण शिकलो की पाप' हा ज्योतिरावांनी वडिलांना विचारलेला प्रश्न सावित्रीला पतीच्या ध्येयाची जाणीव देऊन गेला. ''सेठजी टाकलं पाऊल मागं घेऊ नका. तुम्ही शिकावं असं मलाबी वाटतं'' या शब्दात त्यांनी पतीला ताकद दिली. ज्योतिरावांनाही एक नवा मार्ग सापडला. त्यांनी स्वतः शिकून सावित्रीबाईंना शिकवले. सगुणाऊ तर सोबत होतीच. दोघींनी रितसर शिक्षण घेतले.

१ मे इ. स. १८४८ रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागासाच्या वस्तीत एक शाळा काढून दिली ही त्यांची पहिली शाळा. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे भिड्यांच्या वाड्यात शाळा सुरु झाल्यानंतर सगुणाऊला त्या शाळेत बोलविण्यात आलं. गोऱ्या साहेबाने एक शोध लावला की, 'जो शिकणार नाही त्याच्या चौदा पिढ्या नरकात जातील.' नरकाच्या भितीने का होईना लोक शिक्षणाला होकार देऊ लागले.

जानेवारी इ.स. १८४८ रोजी भिडे वाड्यात त्यांनी पहिली शाळा सुरु केली. जी शाळा मुलींची होती. तत्कालीन ब्रिटिश काळात भारतातील एकदेशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली. सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागातही २-३ मुलांच्या शाळा त्यांनी सुरु केल्या व काही काळ चालविल्या.

सुरुवातीला शाळेत सहा मुली होत्या पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०-४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी 'धर्म बुडाला, जग बुडणार, काळ आला'' असे सांगुन केले. सनातन्यांनी विरोध केला. अंगावर शेण फेकले. काही उन्मतांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. अनेक संघर्ष

करत हा शिक्षण प्रसाराचा उपक्रम चालुच होता. घर सोडावे लागले, सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. अखेर पुण्यामध्ये आलेल्या प्लेगच्या साथीत लोकांची सेवा करताना सावित्रीबाई १० मार्च १८९६ रोजी मृत्यू पावल्या.

## सावित्रीबाईच्या लुगड्याची गोष्ट

रात्रीची वेळ, निरव शांतता, तेलाच्या दिव्याचा मिणमिणता प्रकाश. सावित्रीबाई पाघरूण अंगावर घेऊन झोपण्याच्या तयारीत होत्या. ज्योतिराव कौतुकाने आपल्या बायकोच्या कपाळावर हात ठेवतात. ''सावित्री !'' ज्योतिराव उद्‌गारले 'अगं, तुझं अंग गरम आहे. ताप येतोय का तुला?'' अहो, एवढं काही नाही. थोडी कण कण आहे, झालं.''

ज्योतिराव – '' अग पण ही कण-कण वाढली तर आपल्या शाळेचं कसं होईल ? मुलींच्या शिक्षणाचं काय होईल ?

सावित्रीबाई – '' अहो हा ताप औषधाने नाही जायचा'' सावित्री ''मग गं'' ज्योतिरावांचा आश्चर्यचकित प्रश्न. ''तुम्ही मला शाळेत जाण्यासाठी अजून एक लुगडं देऊ शकलात तर हा ताप आपोआप जाईल.'' सावित्रीबाईः ज्योतिराव काहीशा नाराजीने दुसऱ्या कुशीवर वळून झोपण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांचे विचारचक्र सुरु झाले. लुगड्यासाठी ताप घेणारी सावित्री नाही... मग तिच्याकडे एक लुगडं असताना ती दुसरं लुगडं का मागते. आपल्याकडे जे पैसे आहेत ते शिक्षण कार्या करता आहेत. बायकोच्या लुगड्या करीता नव्हे. पण सावित्री शाळेत जाण्याकरीता लुगडं मागतेय म्हणजे नक्कीच काहीतरी कारण असणार. विचार करीत करीत ज्योतिराव झोपून गेले. दुसऱ्याच दिवशी ज्योतिरावांनी सावित्रीबाईच्या हातावर नवे लुगडं ठेवले. बाईंच्या डोळ्यात पाणी आलं... लुगड्यासाठी खर्च करायला ज्योतिरावांना खुप त्रास झाला असणार कारण त्यांच्याजवळ जे पैसे आहेत ते शिक्षण कार्याकरीता आहेत. सावित्रीबाईचे शाळेतील जे सहायक होते त्यांची भेट घेतली आणि त्यांना सविस्तर प्रसंग सांगितला.

त्यांनी उलगडा केला, ''सावित्रीबाई शाळेत येताना लोक अंगावर शेण चिखलाचा मारा करतात. बाई शाळेत आल्यावर अंगावरील लुगड्यावरचं शेण चिखलाचे डाग धूऊन आल्या लुगड्याने दिवसभर शाळेत शिकवितात. त्यामुळे रात्री त्यांना ताप येत असेल परंतु आता तुम्ही त्यांना दुसरं लुगडं दिल्यापासून शाळेत आल्यावर लुगडं बदलुन शाळेत शिकवितात. त्यामुळे आता त्यांना ताप येत नसेल. आता ज्येतिरावांच्या डोळ्यात पाणी आलं. सावित्रीबाईंच्या महानतेस ज्योतिरावांनी मनोमन प्रणाम केला.

आपणही त्या दोन्ही महान विभूतीस प्रणाम करू या. कारण त्यांच्यामुळेच आजच्या स्त्रिया ज्या कुठल्याही धर्माच्या असो त्या शिकू शकल्या.

शिक्षणात अग्रेसर असलेले तसेच विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात आले. हा एक महिला शिक्षिकेचा सर्वोच्च सन्मान आहे.

**– संजु दशरथ पाल**
एफ.वाय.बी.कॉ

# वाचन संस्कृती

वाचन संस्कृती या शब्दाचा वापर 'वाचन' या शब्दाला समानार्थी किंवा पर्यायी शब्द म्हणून केला जातो. वाचन संस्कृती निर्माण होण्यासाठी काही पूरक घडामोडी समाजात सतत घडाव्या लागतात. त्यातील काही संस्थात्मक व काही नैमित्यिक असतात. त्यांच्या आदान - प्रदानातून वाचन संस्कृती सुकर होते. वाचन संस्कृतीची व्याख्या प्राध्यापक समीक्षक राजशेखर शिंदे यांनी अत्यंत सुंदर केलेली आहे., ती खालीलप्रमाणे :-

" सुसंस्कृत, सुशिक्षित समाजात साहित्य, संगीत, ललितकला आणि वैचारिक व वैज्ञानिक शास्त्रे याविषयी विचार करून इतरांना विचार करायला लावणारी संस्कृती म्हणजे वाचन संस्कृती होय."

संस्कृतीचा अर्थ सर्वसमावेशक कृती असा होतो. धर्मासह समग्र अंतबाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो.

"प्रकृती म्हणजे निसर्ग. विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचे संस्कार"

वाड्मयीन संस्था, साहित्य संमेलने, पुस्तक प्रदर्शने, लेखक- वाचक मेळावे, ग्रंथालये, वाड्मयीन नियतकालिके, दैनिकांच्या पुरवणीतील लेखन, अभिवाचन / वाचन मंडळे, भाषांतरे, बुक ऑन बुक्स ही वाचन संस्कृतीची अंगे आहेत. वाचन संस्कृतीचे भवितव्य समाजाच्या धारणेवर अवलंबून असते. संस्कृती ही समाज रितीरिवाजांच्या समूहात घडत असते. ती घडते तेव्हा मानवी समूहाचे उत्थान झालेले असते. वाचन संस्कृतीमुळे समाज मनाचे उन्नयन होते. केवळ पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होत असतील. त्यांचा खप होत असेल. ती वाचली जात असतील म्हणजे त्या समाजात वाचन संस्कृती असेलच असे नाही. मात्र मराठीत यालाच वाचन संस्कृती म्हणण्याचा प्रघात आहे. लोक कोणती पुस्तके वाचतात. त्याचा आचार, विचारावर कोणता व कसा फरक पडला आहे. बौद्धिक व भावनिक स्तर कशाप्रकारे उन्नयन झाले आहे हे महत्वाचे असते. जो समाज आपल्या भौतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नयनासाठी ज्ञानाचा मार्ग अनुसरतो; त्या समाजातील वाचन संस्कृतीचे भवितव्य उज्ज्वल राहते. तसेच जो समाज ज्ञानाशिवाय मार्ग अवलंबितो त्या समाजातील वाचन संस्कृती ही अलगत होऊ लागते. अशा समाजाची भौतिक प्रगती होत राहते; पण तो सांस्कृतिकदृष्ट्या व बौध्दिकदृष्ट्या कुपोषित होऊ लागतो. ज्ञान निर्मितीचा तो आदर करेनासा होतो. ज्ञान ही मनुष्याची मोठी शक्ती आहे. म्हणून तर म्हटले आहे "वाचाल तर वाचाल."

आज भारतात सर्वात संपन्न धर्म कोणता असेल तर तो म्हणजे शिख धर्म आहे. कारण शिख धर्माने ग्रंथाला गुरु मानले आहे. 'गुरुग्रंथ साहिब' हा त्यांचा धर्म ग्रंथ आहे. पुस्तके वाचनाची सवय असणाऱ्या माणसाला माणसे वाचायला आणि माणसे वाचवायला वेळ लागत नाही. जे तुम्हाला विचार करायला लावते ते खरे पुस्तक आणि जे तुम्हाला कृती करायला लावते ते खरे वाचन आहे.

" वाचन संस्कृती घरोघरी तिथे फुले ज्ञानपंढरी"

काही लोक ईश्वरवादी असतात. ते आस्तिकवादी पुस्तक वाचतात. तसेच काही नास्तिक असतात ते नास्तिकवादी पुस्तक वाचतात. पण मला असे वाटते की, आपण आस्तिकवादी पुस्तक वाचू नये आणि नास्तिकवादी पुस्तकही वाचू नये. आपण वास्तववादी पुस्तके वाचली पाहिजेत.

"ज्याच्या घरी नाही पुस्तकाचे कपाट
त्याचे घर होईल भुईसपाट"

# वाचन संस्कृती

वाचन संस्कृती या शब्दाचा वापर 'वाचन' या शब्दाला समानार्थी किंवा पर्यायी शब्द म्हणून केला जातो. वाचन संस्कृती निर्माण होण्यासाठी काही पूरक घडामोडी समाजात सतत घडाव्या लागतात. त्यातील काही संस्थात्मक व काही नैमित्यिक असतात. त्यांच्या आदान – प्रदानातून वाचन संस्कृती सुकर होते. वाचन संस्कृतीची व्याख्या प्राध्यापक समीक्षक राजशेखर शिंदे यांनी अत्यंत सुंदर केलेली आहे., ती खालीलप्रमाणे :–

" सुसंस्कृत, सुशिक्षित समाजात साहित्य, संगीत, ललितकला आणि वैचारिक व वैज्ञानिक शास्त्रे याविषयी विचार करून इतरांना विचार करायला लावणारी संस्कृती म्हणजे वाचन संस्कृती होय."

संस्कृतीचा अर्थ सर्वसमावेशक कृती असा होतो. धर्मासह समग्र अंतबाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो.

"प्रकृती म्हणजे निसर्ग. विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचे संस्कार"

वाड्मयीन संस्था, साहित्य संमेलने, पुस्तक प्रदर्शने, लेखक- वाचक मेळावे, ग्रंथालये, वाड्मयीन नियतकालिके, दैनिकांच्या पुरवणीतील लेखन, अभिवाचन / वाचन मंडळे, भाषांतरे, बुक ऑन बुक्स ही वाचन संस्कृतीची अंगे आहेत. वाचन संस्कृतीचे भवितव्य समाजाच्या धारणेवर अवलंबून असते. संस्कृती ही समाज रितीरिवाजांच्या समूहात घडत असते. ती घडते तेव्हा मानवी समूहाचे उत्थान झालेले असते. वाचन संस्कृतीमुळे समाज मनाचे उन्नयन होते. केवळ पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होत असतील. त्यांचा खप होत असेल. ती वाचली जात असतील म्हणजे त्या समाजात वाचन संस्कृती असेलच असे नाही. मात्र मराठीत यालाच वाचन संस्कृती म्हणण्याचा प्रघात आहे. लोक कोणती पुस्तके वाचतात. त्याचा आचार, विचारावर कोणता व कसा फरक पडला आहे. बौद्धिक व भावनिक स्तर कशाप्रकारे उन्नयन झाले आहे हे महत्वाचे असते. जो समाज आपल्या भौतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नयनासाठी ज्ञानाचा मार्ग अनुसरतो; त्या समाजातील वाचन संस्कृतीचे भवितव्य उज्वल राहते. तसेच जो समाज ज्ञानाशिवाय मार्ग अवलंबितो त्या समाजातील वाचन संस्कृती ही अलगत होऊ लागते. अशा समाजाची भौतिक प्रगती होत राहते; पण तो सांस्कृतिकदृष्ट्या व बौध्दिकदृष्ट्या कुपोषित होऊ लागतो. ज्ञान निर्मितीचा तो आदर करेनासा होतो. ज्ञान ही मनुष्याची मोठी शक्ती आहे. म्हणून तर म्हटले आहे "वाचाल तर वाचाल."

आज भारतात सर्वात संपन्न धर्म कोणता असेल तर तो म्हणजे शिख धर्म आहे. कारण शिख धर्माने ग्रंथाला गुरु मानले आहे. 'गुरुग्रंथ साहिब' हा त्यांचा धर्म ग्रंथ आहे. पुस्तके वाचनाची सवय असणाऱ्या माणसाला माणसे वाचायला आणि माणसे वाचवायला वेळ लागत नाही. जे तुम्हाला विचार करायला लावते ते खरे पुस्तक आणि जे तुम्हाला कृती करायला लावते ते खरे वाचन आहे.

" वाचन संस्कृती घरोघरी तिथे फुले ज्ञानपंढरी"

काही लोक ईश्वरवादी असतात. ते आस्तिकवादी पुस्तक वाचतात. तसेच काही नास्तिक असतात ते नास्तिकवादी पुस्तक वाचतात. पण मला असे वाटते की, आपण आस्तिकवादी पुस्तक वाचू नये आणि नास्तिकवादी पुस्तकही वाचू नये. आपण वास्तववादी पुस्तके वाचली पाहिजेत.

"ज्याच्या घरी नाही पुस्तकाचे कपाट
त्याचे घर होईल भुईसपाट"

**वाचनाचे महत्त्व :-**

वाचनाने अशक्त मन सशक्त होते. वाचन माणसाला स्वंयपूर्ण बनवते. वाचन आपल्याला ज्ञानाच्या अथांग सागरात आणून सोडते. ज्याप्रमाणे व्यायाम शाळेत आपण शरीरासाठी व्यायाम करतो. शरीराला आकार देतो. त्याचप्रमाणे वाचन हा बुध्दिचा व्यायाम आहे; मनाचा व्यायाम आहे. त्यामुळे आपले जीवन समृध्द व स्वयंपूर्ण बनते.

''पुस्तकांशी करता मैत्री
ज्ञानाची मिळते खात्री''

**वाचनाचे फायदे :-**

१) वाचनाची सवय ही आपली मन व बुध्दी तरूण ठेवते. तसेच आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी मदत करते. वाचनाची सवय ही आपल्याला नवनवीन गोष्टी शिकवण्यास मदत करते.

२) वाचनाची सवय आपल्याया अधिक समजदार बनवते

३) वाचनाची सवय आपला दृष्टिकोन सकारात्मक बनवते तसेच वाचनाची सवय आपला तणावदेखील कमी करते.

४) जेवढे उत्तम नेते असतात ते उत्तम वाचक असतात. जगात जेवढेपण यशस्वी लोक आहेत ते दिवसातून काही वेळ वाचन नक्की करतात.

५) बौध्दिक आणि सामाजिक विकासासाठी वाचन हे खूप महत्त्वाचे आहे.

पुस्तके व ग्रंथ यांसारखा दुसरा गुरु नाही. आपण कोणतेही चांगले लेखक निवडून त्यांच्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. तसेच त्यांच्या सिध्दांन्ताचा उपयोग जीवन जगत असताना आपण केला पाहिजे त्यामुळे आपल्या जीवनात अमूलाग्र बदल होतील.

वाचनाची आवड असणारे वाचक सर्व प्रकारची पुस्तके विकत घेऊन वाचू शकत नाहीत. अशावेळी त्यांच्या मदतीला येते ते ग्रंथालय. यशस्वी झालेल्या अनेक व्यक्तिंच्या जीवनात ग्रंथालयांनी, पुस्तकांनी मोलाची भूमिका बजावली आहे. वाचन संस्कृतीचा मोठा वारसा महाराष्ट्र राज्याला लाभलेला आहे. राज्यामध्ये मार्च २०१६ अखेर १२ हजार १४४ सार्वजनिक ग्रंतालयांना शासन मान्यता देण्यात आलेली आहे. पुस्तक हे माणसाचे जवळचे मित्र मानले जातात. कारण पुस्तकांकडून आपल्या आयुष्याबाबत अनेक चांगल्या गोष्टींचे मार्गदर्शन मिळते. वाचनामुळे आपल्या विचारांना स्पष्टता येते.

'' वाचनाने समृध्द होते मती
मिळते आपल्या विकासाल गती''

एक पुस्तक एखाद्याच्या आयुष्याला कलाटणी देवू शकते. एक पान एखाद्याचे भविष्य बदलू शकते आणि एखादे वाक्य एखाद्याच्या आयुष्याचे ध्येय ठरवू शकते. काही जण PDF फॉरमॅट मध्ये त्यांचा वाचनाचा छंद आजही जोपासत आहेत. पण पुस्तक हातात घेऊन वाचनाची मजाच वेगळी असते. म्हणून शेवटी म्हणावेसे वाटते, ''वाचाल तर वाचाल.''

**- मयुरी शरद नरवडे**
टी.वाय.बीए

# स्त्री भ्रूण हत्या : एक विचार

'उषःकाल होता होता काळ रात्र झाली गर्भजल चिकित्सेची लाट हो आली अपराध नसतानाही मुलगी का हो मेली ?

भारतातील संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. इथली मूल्ये, कुटूंब व्यवस्था, स्त्रीला प्राचीन काळापासून मिळणारा मान, सन्मान हा भौतिकदृष्टया पुढारलेल्या पाश्चिमात्त्य जगाचा कुतूहलाचा कायम विषय ठरलेला आहे. 'यत्र नार्यस्तू पुज्यते । रमन्ते तत्र देवता ।' म्हणजे जिथे स्त्रीची पूजा केली जाते; तेथे देवता वास करतात अशा अर्थाचे सुभाषित आपल्याकडे आहे.

भारतीय कुटुंब व्यवस्थेत स्त्रीला महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. पाश्चात्त्य संस्कृतीच्या तुलनेत भारतीय कुटूंब व्यवस्थेचे खूपच गोडवे गायले जातात. कुटूंबातील प्रमुख घटक म्हणजे स्त्री होय. पुरूष व स्त्री संसाराच्या रथाची दोन चाके मानली जातात. पुरुषाने अर्थार्जन करून एक जबाबदारी पार पाडायची व स्त्रीने कुटुंबाचे पालन पोषण करायचे अशी विभागणी होती. परिणामी स्त्रीच्या नशिबी चूल आणि मूल आहे. पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेने स्त्रीला गुलाम करून टाकले. स्त्री आणि पुरुषात प्रकृती भेद केला गेला. स्त्री-पुरूष अशी एक फळी निर्माण झाली. स्त्री-पुरुष भेदभावाच्या समस्येने समाजाला साखळदंडाने घेरले गेले. लिंग भेदाचा पगडा पुल्लिंगाला प्राधान्य म्हणून स्त्रीलिंगाला नकार आणि त्याचं टोक म्हणजे स्त्री भ्रूण हत्या....

मातेच्या गर्भाशयात वाढ होत असलेली मुलगी जन्माला येण्यापूर्वीच मारून तिचे अस्तित्व संपवणे म्हणजेच स्त्री भ्रूण हत्या करणे होय. असे का होते ? कधी पासून होत आहे ? यावर उपाय काय? समस्यांची साखळी अलगद उलगडली. एकेक गाठ सोडवत या समस्येच्या कड्या विलग केल्या की, या संदर्भातील अनेक कारणे दिसून येतात. मुलगी नको मुलगाच हवा हा अट्टाहास. मुलगी म्हणजे परके धन. मुलीला दुय्यम वागणूक, हुंडा पद्धती, महिलांमध्ये असणारी आर्थिक, सामाजिक व शारीरिक असुरक्षितता, कुटुंबनियोजन केलेले नसणे, मुलगी अविवाहीत राहिल्यास कुटुंबाला कलंक आहे अशी भावना. गर्भलिंग निदानाची सहज व परवडण्याजोगी उपलब्धता, गर्भात गंभीर दोष असणे, वैद्यकीय क्षेत्रातील ढासळलेली नैतिकता, काही राज्यांमध्ये असणारी दोन अपत्य धोरण, महिलांचे बाजारीकरण, पिता झाल्यावर पितृऋण फिटते हे मानणे, मृत्यूनंतर मुलाने अग्नी दिले पाहिजे हे मानणे, 'मुलींचं शिक्षण, तिच संगोपण, तिचं लग्न.. त्यासाठी येणारा खर्च, काढावं लागणारं कर्ज अशा अनेक समस्या आहेत. थोडक्यात काय तर पारंपारिक रूढी आणि आधुनिक तंत्रज्ञान या दोहोंची हातमिळवणी होऊन मुलगी जन्मालाच येऊ न देण्याचा उपक्रम भारतभर चालु आहे.

कळी कोवळी फुलण्याआधी का खुडते ग अशी । आर्त जिवाची तडफड आई, तुला कळेना कशी ।।

स्त्री भ्रूण हत्येचे सामाजिक आणि नैसर्गिक परिणाम फार भीषण आहेत. ज्याची आता केवळ कल्पनाच केली जाऊ शकते. आज या प्रश्नाने अक्राळ विक्राळ रूप धारण केले आहे. आपले हायटेक समाज मन किती रानटी आणि विकृत आहे याचं दर्शन घडलं. सन २००९ च्या जनगणनेनुसार भारतातील ११ राज्यामध्ये आधीच्या दशकाच्या तुलनेत घसरलेले स्त्री पुरूष प्रमाण आढळून आले होते. विशेषतः केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्त्री पुरुष प्रमाण हे १९६१ च्या जनगणनेपासून सतत कमी होत आहे. देशात दमण आणि दीव ६१८ (२००१-७०९) दादर-नगर हवेली ७७५ (२००९-८११) जम्मु काश्मीर ८८३ (२००१-९००) बिहार ९१६

(२००१-९२१) गुजरात ९१८ (२००१-९२१) उत्तराखंड ९६३ (२००१-९६४) या राज्यामध्ये सर्वात कमी स्त्री पुरूष प्रमाण सन १९६१ मध्ये १००५ इतके नोंदविण्यात आले. नंतर ते घसरत घसरत सन १९९१ मध्ये ९०७ इतके नोंदविले गेले सन २००१ मध्ये त्यात वाढ झाली असली तरी २०११ च्या जनगणनेत मात्र पुन्हा ९१६ पर्यंत घट झालेली दिसून येते. गुजरातमध्येही स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री-पुरूष प्रमाणात सातत्याने घट नोंदविण्यात आली असून सन १९६१ मध्ये ९४० असणारे प्रमाण सन २०११ च्या जनगणनेत ९१८ इतके नोंदविण्यात आले आहे.

महाराष्ट्रासारख्या प्रगत व पुरोगामी राज्यातही १९९१ साली दर हजार पुरूषांमागे ९३४ स्त्रीया असे प्रमाण होते. ते २००१ मध्ये ९२२ पर्यंत म्हणजे १२ अंकाने कमी झाले आहे. १९९१ मध्ये महाराष्ट्रात ० ते ६ वर्ष वयाच्या बालकांमागे ९४६ मुली होत्या तर २००१ मध्ये ९१३ व २००९ मध्ये हे प्रमाण ९०९ वर येऊन ठेपले आहे.

राज्यातील १२६ तालुक्यात ३६ टक्क्यांनी, ८१ तालुक्यात २३ टक्क्यांनी, ५९ तालुक्यात १७ टक्क्यांनी, ३७ तालुक्यात १० टक्क्यांनी तर ९ तालुक्यात २ टक्क्यांनी मुलींचे प्रमाण घटले आहे. यात थोडी समाधानाची बाब अशी की, ३८ तालुक्यात ११ टक्क्यांनी मुलींचे प्रमाण वाढले असून ३ तालुक्यात हे प्रमाण स्थिर आहे. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागाने प्रसारीत केलेल्या आकडेवारीनुसार ० ते ६ वर्ष वयाच्या बालिकांचे प्रमाण मोठ्या शहरात झपाट्याने घटताना दिसत आहे. त्या तुलनेत लहान जिल्हे व अविकसित जिल्हे याला अपवाद ठरत आहेत.

नवजात बालिकांचा जन्म होण्याआधीच त्यांना मारणं या अट्टाहासाचं पेव सोनोग्राफी आणि गर्भजल परीक्षा पद्धतीमुळे वाढते आहे. वास्तविक या वैद्यकीय चाचण्यांचा शोध लावला तो मातेचा गर्भ सुरक्षित आहे की नाही तो पाहण्यासाठी काही अनुवांशिक रोग अथवा अपंगत्व अर्भकात आले असले तर त्यावर उपचार करण्यासाठी. गर्भजल परीक्षेच्या निमित्ताने वैद्यकीय उपचार करण्यासाठी विज्ञानाने एक पाऊल पुढे टाकले खरे; पण त्याचवेळी समाजाच्या मानसिकतेने एक विकृत रूप धारण केले.

स्त्रीभ्रूण हत्येतून सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. पुरोगामी विचारसरणीच्या अनेक जिल्ह्यात हजार मुलांमागे ८९० मुली आहे. मुलींचे महत्त्व त्यांच्या अस्तित्वाचे भान जागृत करण्यासाठी समाज शिक्षणाची आवश्यकता आहे.

मुलीचा जन्म म्हणजे अचानक कोसळलेले संकटच होय. अर्भक नको असेल तरच तिचा गर्भपात तिच्या घरच्यांच्या परवानगीने करावयाचा असतो. पण आता परिस्थिती इतकी पालटली आहे की, गल्लोगल्ली दवाखाने उघडून डॉक्टर मंडळी बसली आहेत. पैशाच्या प्रलोभनास बळी पडून काहीजण गर्भपाताचे काम बिनबोभाट पार पाडत आहेत. अशा या डॉक्टरांना जीवन दाते म्हणावे की जीव घेणारे राक्षस ? काहीच सुचेनासे झाले आहे. मुलगी म्हणजे हुंड्याची काळजी, मुलीच्या शिक्षणाचा कुटुंबाला उपयोग शून्य, मुलगी म्हणजे परक्याचे धन अशी अनेक कारणे सांगत स्त्री पुरूष समानतेचा मुद्दाच अनेकांनी निकालात काढला आहे. भ्रूणहत्या हे पाप समजणाऱ्या स्त्रियांदेखील मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात करणे श्रेयस्कर मानताना दिसतात.

''एक नन्ही सी कली, खिलनेसे पहले कुचली !'' यामुळे संख्यात्मक विषमता झाली आहे. कायद्याच्या नजरेत भ्रूणहत्या हा दखलपात्र गुन्हा आहे. मुलगा मुलगी यामध्ये भेद करणाऱ्या

मानवताशून्य समजुती पुसून टाकणे आवश्यक आहे. विज्ञानयुगात वावरताना विज्ञान हवे आहे. पण विज्ञानाला नैतिकतेची जोड नसेल तर हिरोशिमा, नागासकी नष्ट होतात हे सत्य आहे. आज तोच कित्ता गाजवणारे मुलीचा जीवच नष्ट करीत आहेत. गर्भावस्थेतील अनेक मुलींचा आक्रोश आजही आपल्या अंतः करणाला पाझर फोडीत नाही अशा या निष्ठूर समाजमनाला सांगावेसे वाटते.

**बता दे इस दुनिया को ।**
**औरत होना अपराध नही ।।**

अशा अनेक कारणांनी मुली जन्माला येण्यापूर्वीच त्यांना नष्ट करण्याचा घाट आपण घातलेला आहे.

**जीवनात जगण्याचे मार्ग जरी खुंटले ग ।**
**या तुझ्याच देवतांनी तुलाच लुटले ग ।।**

गर्भजल लिंग परीक्षा करून स्त्री भ्रूण हत्या करणे ही बाब वरवर फक्त स्त्रियांचे समाजातले पुरूषांच्या तुलनेत प्रमाण कमी होण्यापुरतीच दिसत असली तरी तेवढ्या पुरतीच ती मर्यादित नाही. या गोष्टींचे बरेच पैलू आहेत आणि बराच खोल असा अर्थ आहे. स्त्रीच्या अस्तित्वाला दुय्यम महत्त्व असण्याची ती सुरुवात असते. शक्यतोवर स्त्री गर्भाचा जन्म होऊच द्यायचा नाही. त्यातही जन्म झाला तर छुपे किंवा उघडे दुःख साजरे करायचे. त्यानंतर आयुष्यातल्या प्रत्येक महत्त्वाच्या वळणावर स्त्री आणि पुरुष या भेदामध्ये स्त्रीने मागे राहायचे किंवा तिला डावलायचे. या संपूर्ण प्रक्रियेला गर्भपात परीक्षेपासूनच सुरुवात होते.

**औरत ने जन्म दिया मर्दो को ।**
**मर्दो ने उसे दिया बाजार ।।**

भारतीय संस्कृती पुरूष प्रधान व्यवस्थेवर आधारित असल्याने सर्व मातापित्यांना मुलगाच हवा आहे. कारण मुलगा हा वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी, आपली गादी पुढे चालविणारा वारस तर मुलगी म्हणजे परके धन. या भ्रामक समजूती समाजात रूढ झालेल्या आहेत. वंशाचा दिवा म्हणून मुलगा हवा असतो. मुलगी वंशाचा दिवा ठरूच शकत नाही? या बाबतीत कोणत्या एका जातीचे व समाजाचे वेगळे नाव घेता येणार नाही. एवढी सर्व जातींची व समाजाची या एका मुद्यावर एक वाक्यता दिसून येते. एकंदरीतच मालिका, चित्रपट, कथा, कांदबऱ्या या साऱ्यांमध्ये मुलगा होणे या गोष्टीला काहीतरी उत्सवी महत्त्व दिलेले असते. या उलट मुलगी होणे या गोष्टीवर विषादाची छाया पसरलेली असते.

विशेष म्हणजे आज विकासाची प्रक्रिया गतिमान आहे. शिक्षणाचा स्तर उंचावला आहे अशा शहरी भागात स्त्री भ्रूण हत्येचं प्रमाण जास्त दिसून येत आहे. फक्त चांगले कपडे घालणे व राहणीमान बदलल्याने त्यांची मानसिकता बदलली असे म्हणता येणार नाही. शहरातील ही पिढी जागतिकीकरणाच्या संक्रमणकालात एकीकडे स्वतःचे करिअर घडवते आहे. तर दुसरीकडे मुलाचा गर्भ काढुन टाकणे, तिची हत्या करणे असे अघोरी कृत्य करत आहे. फक्च चांगले कपडे घालणे व राहणीमान बदलल्याने मानसिकता बदलली असती तर असले प्रकार घडलेच नसते.

ऐनक लगाके आँखोपे नजर नही बदली जाती ।
नये नये कपडे पहननेसे नियत नही बदली जाती ।।

आज सर्व महत्त्वाच्या शहरामध्ये किंवा गावामध्येही जिथे चांगल्या आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध नाहीत. तिथेही स्त्री भ्रूण हत्या करण्याची व्यवस्था उपलब्ध आहे लिंग निवडीस प्रतिबंध हा कायदा अस्तित्वात असुनही लिंग निदान आणि नंतर स्त्री गर्भाची हत्या केली जाते. अनेक पळवाटा कायद्यातून शोधल्या जातात. सर्वांनीच विचार करा. आता तरी हे थांबायला हवे असे मनापासून वाटते.

**– भाग्यश्री राख**
एफ.वाय.बी.कॉम

# पद्मश्री पोपटरावजी पवार

(काळ्या मातीचं सोनं करणारे परिस. सरपंच पद्मश्री पोपटराव पवार यांच्या कार्याबद्दल माहिती घेणे आपणा सर्वांसाठी आवश्यक आहे.

१९७२ ला महाराष्ट्रात दुष्काळ पडला. ह्या दुष्काळाचा सर्वात जास्त फटका बसला तो अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार गावाला. दुष्काळाने गावची परिस्थिती पूर्णतः खालावली. गावातील सगळ्या विहीरी कोरड्या पडल्या. सगळी पिके नष्ट झाली. उत्पादनाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने लोकांना नैराश्य आले. सगळीकडे दारूचे व्यसन पसरले. गावातील जवळपास ९०% लोकांनी गावाला रामराम केला. अशा परिस्थितीत गावातील तरूणांनी एकत्र येऊन गावाचा चेहरा बदलवायचा निर्णय घेतला. इ.स. १९८९ ला त्यांनी या लढ्याचं नेतृत्त्व एका जिगरबाज तरूण सरपंचाकडे सोपवलं... त्यांचे नाव पोपट बागुजी पवार अर्थात आत्ताचे पद्मश्री पोपटरावजी बागुजी पवार होय.

कोणतेही काम करायचे म्हणल्यानंतर विरोध हा होतच असतो. त्याचप्रमाणे आदरणीय पोपटरावांनासुध्दा हा विरोध झाला. त्यातली त्यात घरातूनच या विरोधाची सुरूवात झाली परंतु पोपटराव आपल्या निर्णयावर ठाम होते. तसे पाहिले गेले तर पोपटराव हे एक उच्चशिक्षित व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण (१ ली ते ४ थी) हे गावातच झाले. त्यानंतरचे शिक्षण नगरला झाले. ११ वी १२ वी विज्ञान शाखेत केली. कॉलेजला असताना क्रिकेटची आवड होती. त्यातूनच त्यांची राज्याच्या शालेय कॅम्पसाठी निवड झाली. क्रिकेटची आवड काही केल्या सुटेना. पुन्हा कॉमर्सची पदवी घेत असताना पुणे विद्यापीठासाठी चेन्नई या ठिकाणी क्रिकेट खेळले. एक उत्तम क्रिकेटर म्हणून चांगले नाव मिळविले परंतु गाव सोडून चैन पडेना. मग 'गड्या आपला गावच बरा' या उक्तीप्रमाणे पोपटराव १९९० साली पुन्हा एकदा हिवरे बाजारला परतले आणि मग सुरु झाला ग्रामविकासाचा गावगाडा... !

गावी आल्यानंतर गावच्या भानगडीत पोपटराव लक्ष देऊ लागले. हे काही त्यांच्या आईला सहन होईना. या कारणाने आई ८ दिवस घर सोडून मामाच्या गावी केडगावला निघून गेली परंतु विडा उचलला होता, संकल्प केला होता. तो पुर्णत्वास न्यायचा होता. गावी परतल्यानंतर त्यांचे वय होते अवघे २६-२७ वर्षे. त्यातच ग्रामपंचायत निवडणूक लागली आणि पोपटराव पवार सरपंच झाले. छोट्या छोट्या मदतीसाठी मुबंई दिल्लीची वाट बघून चालणार नाही. जे काही करायचं ते आपल्याला करायचे हे सरपंच ओळखून होते. सरपंच झाल्यानंतर त्यांनी पहिला निर्णय घेतला दारूबंदीचा आणि केली अंमलबजावणी. महाराष्ट्र सरकारकडून कर्ज काढून गावात पाणी अडविण्यासाठी त्याकाळी ३२ दगडाचे आणि ५२ मातीचे बंधारे बांधले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर पूर्ण गावात त्यांनी १० लाख वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे काम केले.

थोडयाच दिवसात त्यांच्या मेहनतीचे फळ दिसायला लागले. गावाने केलेल्या पाणी आडवा.. पाणी जिरवा कामामुळे गावातील जमिनीत पाणी पातळी कमालीची वाढली. गावात त्यांनी ऊस व केळी शेतीवर बंधने आणली आणि आजही आहेत. एकेकाळी त्या गावात १८२ पैकी १६८ कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असायची. आज त्या गावात फक्त ३ कुटूंब दारिद्र्यरेषेखाली आहेत. ह्या यशाच्या मागे पोपटराव पवार यांचे व्हिजन तर गावाने ह्याच व्हिजनला आपले मिशन म्हणून माणून केलेले काम कारणीभूत आहे. गावात त्यांनी विकासाची पंचसूत्री राबवली. त्यात श्रमदान, चराई बंदी, कुऱ्हाड बंदी, नशाबंदी आणि कुटुंबनियोजन. प्रत्येक घरात बायोगॅस अनिवार्य केले. गावात विशेष म्हणजे एकही पुतळा नाही. त्यावरील सर्व खर्च हा शाळेवर करून शाळांचा दर्जा सुधरवला. लग्नाआधी प्रत्येक जोडप्याला HIV टेस्ट अनिवार्य केली.

गावाविषयी एकंदरीत सांगताना असे ध्यानात येते की, हिवरे बाजार हे काही एक दिवसात तयार झालेले वैभव नाही; तर त्यासाठी गेली ३० वर्षे गावकऱ्यांसहित सरपंच पोपटराव पवारांनी केलेला संघर्ष आहे. आजतागायत हिवरे बाजार गावाला १०० हून अधिक देशांतील शिष्टमंडळाने भेटी दिल्या आहेत. हिवरे बाजार गावचं पाणी व्यवस्थापन / भूजल व्यवस्थापन बाहेरच्या विद्यापीठात शिकविले जाते ही अभिमानाची गोष्ट आहे. अशा या हिवरे बाजार गावचे मॉडेल आज देशासाठी एक अभिमानाची गोष्ट झाली आहे. तसेच लेह, लडाख मध्ये 'पोपटराव पवारांच्या नावे रजिस्टर तरूण मंडळ आहे. हिवरे बाजार गावच्या कायापालटात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पोपटरावांची नेमणूक महाराष्ट्र शासनाने 'Executive director of Maharashtra State government model village programme अर्थात 'आदर्श गाव योजना कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य म्हणून केली आहे.

त्यातून त्यांनी पहिली २५ गावांची निवड करून मॉडेल बनविले. त्यात लातूरमधील दवणगाव, गडचिरोली मधील गोरलेली, कोठुळा या गावांना एक वेगळी ओळख निर्माण करून दिली.

सरपंच पोपटराव पवार संदेश देताना सांगतात की, आजच्या काळात भूजल व्यवस्थापन काळाची गरज बनली आहे. भविष्यकाळात माती, पाण्याचे आरोग्य व भूजल व्यवस्थापन हा त्रिसूत्री कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. राजकारणावर विशेष भाष्य करतात की, २५ वर्षापूर्वीचे राजकारण हे 'सकारात्मक' होते. आता हे destructive होत चालले. त्यासाठी प्रत्येक गावात 'सकारात्मक कट्टा' तयार होणे गरजेचे आहे. ग्रामविकासासाठी अथवा प्रत्येक गाव मॉडेल करण्यासाठी आतापर्यंत जवळपास १४ लाख कि.मी. यशस्वी प्रवास केला आहे. आणि पुढेही करणार असेही ते सांगतात.

यावर्षी भारत सरकारला त्यांच्या कार्याची दखल घ्यावी लागली आणि 'पद्मश्री' पोपटराव पवारांना बहाल करावा लागला. पुरस्काराविषयी ते सांगतात की, ''हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून गेली ३० वषे संघर्ष करणाऱ्या हिवरे बाजाराच्या लोकांसहित देशांतील २,४७,००० ग्रामपंचायतीचा आणि ६,५०,००० गावांचा आहे.'' त्यांना या कामांसाठी ज्यांनी प्रेरित केले अथवा त्यांनी ज्यांना आदर्श मानलं असे मा. विलास साळुंके (पाणी पंचायत), कै. अप्पासाहेब पवार (ज्यांनी ३५० पाझर तलाव बांधले), डॉ. मुकुंद घारे सर यांना ते विशेष धन्यवाद देतात. त्याचप्रमाणे त्यांना मा.सौ. शोभाताई पवार (पत्नी, जि.प शिक्षिका), प्रसन्ना पवार (मुलगा, Bsc, Agri.) प्राजक्ता पवार-दरे (मुलगी Environmental sicence) यांची कौटुंबिक साथ लाभली. मित्र अथवा नातेवाईक म्हणून मा. विठ्ठलराव दिघे, सयाजी शिंदे, कोतकर परिवार (केडगाव), नाना पाटेकर यांचे विशेष ऋण व्यक्त करतात.

एकेकाळी दुष्काळात होरपळणाऱ्या, अडी-अडचणींनी ग्रासलेल्या गावाला एक नवी उभारी देताना गावातील लोकांसोबत गावातील निसर्ग व स्वच्छता याला महत्त्व दिले. तसेच वाईट प्रवृत्तीचा नायनाट करून संपूर्ण गावाला एका उंचीवर नेऊन पूर्ण जगात 'हिवरे बाजार' हा मापदंड तयार करणाऱ्या 'सरपंच पोपटराव पवार यांना मिळालेला 'पद्मश्री पुरस्कार' सर्वांना भूषणावह आहे. त्यांना पुढील कार्यासाठी अनंत शुभेच्छा...!

**- ऋषिकेश सुरेश काळे**
एफ.वाय.बी.कॉम

# बंकिमचंद्र चटर्जी

वेदमंत्राहून आम्हांला वंदय 'वंदे मातरम्'। स्वातंत्र्य हा एकच ध्यास लागलेल्या क्रांतीवीरांच्या तोंडी अत्यंत पवित्र असे दोनच शब्द होते. ते म्हणजे 'वंदे मातरम्'. हे स्फुर्तीदायी गीत लिहिणाऱ्या बंकिमचंद्र चटर्जी यांचा जन्म दिनांक २५ जून १८३८ साली झाला. ते आधुनिक बंगाली साहित्याचे प्रवर्तक होते. स्वातंत्रप्रेम आणि राष्ट्राभिमानाची जागृती जनतेत व्हावी, यासाठी त्यांनी इ.स. १८७२ साली 'बंगदर्शन' हे बंगाली नियतकालिक काढले.

बंकिमचंद्र यांनी 'वंदेमातरम् हे काव्य लिहिले. ते डेप्युटी मॅजिस्ट्रेट होते. ते आपल्या वडिलांना भेटण्यासाठी कलकत्याजवळील नैहाटी काटालपाडा येथे गेले होते. बंकिमचंद्रांचे घर हे गावातील प्रतिष्ठित कुटुंब होते. त्यांच्याकडे दुर्गादेवीच्या उत्सवास अनेक लोक आले होते. ७ ऑक्टोबर १८७५ हा दिवस होता. मोठ्या समईचा प्रकाश दुर्गादेवीच्या मुखकमलावर पडला होता. बंकिमचंद्र आणि त्यांचे थोरले बंधु संजीवचंद्र खांबाला टेकून बसले होते. दुर्गा देवीच्या दर्शनाने त्यांचे मन प्रसन्न झाले. बंकिचंद्रांच्या मनामध्ये विचारांच्या लाटा उमटल्या. त्यांना त्या देवीच्या जागी 'भारतमाता' दिसू लागली. देवीच्या पायाखाली असलेल्या महिशासुराच्या जागी जुलमी इंग्रज दिसु लागले. बंकिमचंद्रांनी त्यांना दिसणाऱ्या भारतमातेच्या वर्णनाचा एक लेख लिहिला.

ही भारतमाता म्हणजे ब्रम्हांडाच्या सौंदर्याने शोभून दिसणारी माझी माता आहे. मृण्मयी भूमीच्या स्वरूपात ती दिसत आहे. अनंत रत्नांनी ती विभूषीत आहे. तिला दहा हात आहेत. ती दहा दिशांनी पसरलेली आहे. तिच्या हातामध्ये विविध आयुधे आहेत अशी सुवर्णमयी हिंदु भूमीची प्रतिमा बंकिमचंद्रांनी वर्णन केली. त्यांनी मातृभूमीला साद घातली. हे माते तुझ्या पुत्रांना शक्ती दे. माझ्या बांधवांनो, चला या अंधकारमय कालसागरत आपण कोटीकोटी पुत्र उडी घेऊ या. अंधाराची तमा बाळगु नका. आपण त्या मूर्तीची स्थापना करु. या लेखाचे नाव होते ''आमार दुर्गोत्सव.'' हा लेख बंगदर्शन मासिकात प्रसिध्द झाला. हा लेख म्हणजे गद्यामध्ये असलेले 'वंदेमातरम्' होते. हे गीत म्हणजे भारतीय स्वातंत्र लढयाला धारदार शस्त्र देणारे एक महान मंत्र ठरले.

इ.स. १८८० बंकिमचंद्रांनी 'आनंद मठ' ही कांदबरी लिहिली. २८ डिसेंबर १८९६ रोजी कलकत्याला राष्ट्रीय सभेच्या बाराव्या अधिवेशनात कवी रविंद्रनाथ टागोर यांनी देस रागात संपूर्ण गीत गाईले. इ.स. १९०५ मध्ये वंगभंगाच्या चळवळीने सारा देश पेटुन उठला. ७ ऑगस्ट १९०५ रोजी कलकत्याच्या कॉलेज चौकातील प्रचंड सभेत अचानक प्रेरित होऊन कोणीतरी घोषणा दिली. 'वंदे मातरम्' आणि त्याला सर्व उपस्थितांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला ही घटना योगी अरविंद यांनी लिहून ठेवली आहे.

''वंदे मातरम्'' या मंत्राबद्दल महात्मा गांधी यांनी ''हरिजन'' या अंकात म्हटले की, ''जोपर्यंत हे राष्ट्र आहे. तोपर्यंत हे गीत राहणारच''

'' दुर्गेशनंदिनी, कपालकुंडना, आनंदमठ, चंद्रशेखर, विषवृक्ष, मृणालिनी अशा एकाहून एक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. वंदे मातरम् या गीतामुळे त्याचे नाव अजरामर झाले. अशा या महान लेखकाचे दि. ८ एप्रिल १८९४ साली निधन झाले.

**- पवार उमावती त्रिंबक**
एस.वाय.बी.ए.

# संत निळोबाराय

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. वारकरी संप्रदायात संत निळोबाराय यांना मानाचे स्थान दिले जाते. त्यांनी चांगदेव, ज्ञानदेव, कृष्णचरित्र, विरहिणी, गौळणी, काला, खेळ, ललिते, देवभक्त, संवाद, करूणापर अभंग, संतांचे वर्णन, तुकारामाचे वर्णन इत्यादी ग्रंथरचना केलेली दिसून येते. संत निळोबाराय यांचा जन्म घोडनदीच्या काठी शिरुर या गावी झाला. त्यांचे संपूर्ण नाव निळकंठ मुकुंदपंत मकासरे होते. त्यांचे वडिल शिवभक्त होते. शिरूर गावी असलेलेल्या रामलिंगाची ते नित्य नियमाने पूजा करीत असत तसेच शिरूर गावाचे कुलकर्णीपदही त्यांच्याकडे होते. त्यामुळे शिरूर गावात त्यांना मोठा मान होता. मात्र लग्नास दोन तपे उलटूनही पोटी पुत्र नसल्यामुळे पत्नी राधाबाई दुःखी होती. पत्नीच्या आग्रहात्सव त्यांनी महाशिवरात्रीच्या दिवशी पुत्र प्राप्तीसाठी रामलिंगास साकडे घातले. त्यानंतर थोडयाच दिवसात त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. घरात आनंदी आनंद झाला. ब्राम्हण कुटुंबात जन्माला आलेले निळोबाराय लहानपणापासूनच अतिशय धामिक व बुध्दिमान होते. त्यातच त्यांची आई राधाबाई यांची विठ्ठलावर निस्सीम भक्ती होती. त्यामुळे त्यांच्या घरात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण होते. याचा परिणाम निळोबारायांवर झाला. अगदी बालवयातच ते ग्रंथवाचनाकडे वळले. त्यांनी रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, गीता, भागवत अशा अनेक ग्रंथांचे वाचन केले. या ग्रंथवाचनामुळे त्यांच्या मनात वैराग्य निर्माण होऊन ते भगवंत भक्तीकडे वळले.

निळोबाराय हे तरूण वयात आल्यानंतर त्यांनी आपल्या वडिलांकडून कुलकर्णी पदाचे कामकाज शिकून घेतले. त्यांचे वयाच्या १८ व्या वर्षी अप्पासाहेब जहागिरदार यांच्या मैना नावाच्या मुलीशी लग्न झाले. त्यानंतर वर्षभरातच वडिल मुकुंदपंत व आई राधाबाई यांचे निधन झाले. वडिलांच्या निधनानंतर कुलकर्णीपदाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. कुलकर्णीपदाचे काम चोख करीत असताना त्यांच्या कामाबद्दल नागूअण्णा मकासरे यांच्या नातवडांनी तहसिलदाराकडे तक्रार केली. त्यामुळे ऐन दसऱ्याच्या दिवशी निळोबाराय पुजेस बसले असता तहसिलदार दप्तर तपासणीस आले. या घटनेमुळे त्यांचे कुलकर्णीपदावरील मन उडाले. त्यांनी आपला हिशोब चोख देऊन कुलकर्णीपद कायमचे सोडून दिले. आपल्या भक्तीमध्ये कुणाचाही अडसर नको म्हणुन त्यांनी शिरुर गावाचा त्याग करून ते पराशर ऋषींच्या पद्स्पर्शाने पावन झालेल्या पारनेर या गावी राहावयात आले.

पारनेर हे ठिकाण त्यांना खूप आवडले शिवाय गावकऱ्यांच्या मदतीने त्यांना तेथील नागेश्वर मंदिराचे पुजारीपणही मिळाले. नागेश्वराचे पूजारीपण मिळाल्यानंतर त्यांनी पहिल्याच एकादशीला मंदिरात कीर्तन केले. हे कीर्तन गावकऱ्यांना खूप आवडले. पारनेर येथे काही दिवस वास्तव्य केल्यानंतर त्यांना पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेण्याची ओढ निर्माण झाली. त्यानंतर ते आपल्या पत्नीसह पंढरपूरला गेले. पंढरपूर येथील विठ्ठलाची मूर्ती पाहताच त्यांचे डोळे पाणावले आणि मुखातून अभंग प्रकटले.

**झाली भाग्याची उजरी । दृष्टी देखताची पंढरी ।।**
**ठेविले तो कर कटी । जेणे अवलोकिला दिठी ।।**

त्यानंतर निळोबाराय एक आठवडाभर पंढरपूरास राहिले. रोज सायंकाळी ते विठ्ठल मंदिरात कीर्तन करीत असत. त्यांचे कीर्तन ऐकून लोक त्यांना संत निळोबाराय म्हणु लागले. पंढरपूरच्या मुक्कामात निळोबारायांनी दीडशे अभंग रचले.

पंढरपूरानंतर निळोबाराय श्री क्षेत्र आळंदीला गेले. तेथे त्यांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचे अंतःकरण भरून आले. संत

ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीची पूजा केल्यानंतर त्यांनी ज्ञानेश्वरांवर रचलेली आरती म्हटली. तेथे त्यांनी ज्ञानेश्वर मंदिरात कीर्तन केले. त्यांचे कीर्तन ऐकून देवस्थानच्यावतीने भरजरी शालजोडी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

निळोबाराय पारनेरला असताना एक दिवस पिंपळनेरच्या रामचंद्र पाटलांचा मुलगा भुलाजी निरोप घेऊन आला. रामचंद्र पाटील खूप आजारी आहे. पिंपळेश्वराच्या मंदिरात निळोबांचे कीर्तन ऐकण्याची त्यांची इच्छा होती. रामचंद्र पाटलांचा मान ठेवून निळोबाराय पिंपळनेरला आले. पिंपळेश्वराच्या मंदिरात त्यांनी कीर्तन केले. त्यानंतर रामचंद्र पाटलांचा आजार बरा व्हावा म्हणुन त्यांनी पाटलांच्या कपाळाला बुक्का लावला. त्यानंतर चमत्कार झाल्यासाराखे रामचंद्र पाटील आजारातून ठणठणीत बरे झाले. त्यांनी गावकऱ्यांना सांगून संत निळोबारायांसाठी मोठा वाडा बांधून घेतला. पाटलांच्या आग्रहास्तव निळोबाराय सहपरिवार पिंपळनेर येथे राहावयास आहे.

निळाबोरायांचा संसार सुखात चालला होता परंतु संसारात त्यांचे मन लागत नव्हते. त्यांनी देहूस जाऊन संत तुकाराम महाराजांची भेट घेण्याचे ठरविले. संत तुकाराम महाराजांच्या भेटीस देहूस गेल्यानंतर त्यांना समजले की, तुकोबाराय सदेह वैकुंठास गेले. तेथे त्यांनी संत तुकाराम महाराजांचे पुत्र नारायण यांची भेट घेऊन ४० दिवस मुक्काम केला. तेथे असताना त्यांची संत बहिणाबाई यांच्याशी भेट झाली. या मुक्कामात त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे पारायण केले. त्याचवेळी त्यांनी संत तुकाराम महाराजांना गुरू मानून प्रत्यक्ष त्यांच्याकडून अनुग्रह घेण्याचा निर्धार केला. निळोबाराय देहूहून पिंपळनेरला आले. त्यांचे मन अस्वस्थ होते. आम्हास तुकारामबोवांनी अनुग्रह दिला पाहिजे हा एकच ध्यास त्यांच्या मनात होता. ते अन्नपाणी वर्ज्य करून जप करीत बसले एक दिवस, आठवडा करीत एक्केचाळीस दिवस झाले. अखेर तुकोबारायांनी स्वप्नात येऊन सांगितले की, ''निळोबाराय, भागवत धर्माची ध्वजा पुढे चालवा ! वैराग्यवृत्तीने कीर्तनाद्वारे लोकाना भक्तीमार्ग दाखवा.'' आपल्या गुरूंनी केलेल्या उपदेशाप्रमाणे संत निळोबाराय यांनी भागवत धर्माचे कार्य अखेरपर्यंत केले.

निळा म्हणे मज उपदेश केला । सांप्रदाय दिला सकळ जना ।। आपल्या सद्‌गुरूंच्या कृपेने संत निळोबारायांनी १५०० (पंधराशे) अभंगांची रचना केली. आजही वारकरी संप्रदायात कीर्तन प्रवचनातून हे अभंग आळविले जात आहेत. त्यामुळे संत तुकाराम महाराजांच्यानंतर वारकरी संप्रदायाची गुढी उंच ठेवणारे अखेरचे संत कवी म्हणुन त्यांना मानाचे स्थान दिले जाते. असे हे थोर संत इ.स.१७५१ मध्ये फाल्गुन शु.।। द्वितीया माध्यान्ही पिंपळनेर जि. अहमदनगर येथे समाधीस्त झाले. दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथी निमित्त समाधी दिन सोहळा साजरा केला जातो.

**– प्रा.डॉ. के.आर. पिसाळ**

# आजची तरूण पिढी

एक थोर विदवानाने म्हटले होते की, ''तुम्ही मला तुमच्या देशातील तरूणांच्या ओठांवरील गाणे सांगा, मी तुम्हाला त्या देशाची संस्कृती सांगतो.'' आज आपल्या देशातील तरूणांच्या ओठांवर कोणते गाणे आहे? खरंच भारत हा जगातील एकमेव राष्ट्र आहे की, ज्यामध्ये सर्वात जास्त तरूणांची संख्या आहे.आजच्या तरूण पिढीमध्ये खूप काही करण्याची धमक आहे. भारतातील तरुणांना योग्य दिशा मिळाली तर आपल्या देशाची दशा बदलायला फार अवकाश लागणार नाही. आपल्या तरूणांना रूजवण्यासाठी घट्ट मुळे आणि उडण्यासाठी मजबूत पंखाची आवश्कता आहे.

पण आज समाजातील तरूणांची परिस्थिती बिकट बनत चालली आहे. व्यसनाधिनता व मोबाईल सारख्या सापाने आजच्या तरूणांना विळखा घातला आहे. सुशिक्षित बेकारी, बेरोजगारी अशा समस्यामुळे तरुणांची पावले चूकिच्या दिशेने जात आहे. तरूण भरकटत चाललाय.पण याला जबाबदार कोण? दोष दयायचा तो कोणाला? पालकांना, समाजाला की, आजच्या प्रसार माध्यमांना. आजचा तरूण दिशाहीन बनला आहे. भारतासारख्या देशात कित्येक तरूणांची ज्वलंत ऐतिहासिक कारकीर्द असताना तरूणांची ही अवस्था होत चालली आहे.

अरे, याच महाराष्ट्रात शिवाजी महाराजां सारखा राजा होऊन गेला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सहयाद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील तरूण रक्तांच्या मावळयांना संघटित झाले. त्यांच्या मध्ये स्वराज्य प्राप्तीची ज्योत पेटवली आणि महाराष्ट्रातील परकीय सत्ता उलथून टाकली. त्या शिवबाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याची गरज आजच्या तरूणांना आहे. तरूण हा लोकशाहीचा कणा आहे. पण आजचा तरूण हा फक्त रम, रमा, आणि रमी यांच्या आहारी जाऊन स्वःताच्या आयुष्याची रांखरांगोळी करताना दिसत आहे.

भारताच्या इंग्रजाविरूद्धच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या संघर्षात कित्येक तरूणांनी स्वतःच्या प्राणाची आहूती दिली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, बटुकेश्वर दत्त यासारख्या सळसळत्या रक्ताच्या तरूणांनी मातृभूमीच्या रक्षणासाठी स्वतःचं जीवन समर्पित केले. पण आज त्याच भारत देशात आजची आपली तरूण पिढी काय करते? कोणता आदर्श डोळ्यासमोर ठेवते? क्रांतीकारकांच्या देशात क्रांतीकारकांऐवजी आतंकवादी, नक्षलवादी तयार होत आहेत. हे सगळे कुठंतरी थांबायला हवं. आपल्या देशाचा इतिहास तरूणांच्या कार्याने ओतप्रोत भरलेला आहे. इतिहासाच्या पानापानांवर तरूणांनीच देशाची दिशा आणि दशा बदलवली आहे. या इतिहासाच्या पुनरावृत्तीची आज देशाला गरज निर्माण झाली आहे. पण आज मात्र सगळं उलट घडताना दिसत आहे. आजची तरूण पिढी परकीय, चंगळवादी संस्कृतीचे नुसते अनुकरणच करत नाही तर ती संस्कृती आत्मसात करत आहे. पाश्चात्यांच्या भोगवादाचा आणि भौतिक सुखांचा प्रभाव आजच्या तरूणांवर पडत आहे. पाश्चात्यांचे अनुकरण करण्यातच आपले तरूण धन्यता मानत आहे. ज्या देशाच्या संस्कृतीला जगातील एक आदर्श आणि सुसंस्कारीत संस्कृती मानली जाते. त्याच देशातील तरूण पाश्चात्यांचे अनुकरण करतो ही निश्चितच क्लेशदायक बाब आहे. कधीतरी तरूणांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. त्यासाठी आतासारखी वेळ नाही आणि भारतासारखी भूमी नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तरूणांना उद्देशून संदेश दिला होता की, ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.'' पण तोच तरूण संघटित होतोय तो फक्त दंगली, जाळपोळ यांसारख्या समाजविघातक कृत्यांसाठी. चोरी, बलात्कार यांसारखी दृष्कृत्ये करण्यासाठी. परिणामी स्वतःच्या जीवनाचे सुंदर घरटे बनवण्याआधी तुटून जाते आणि

आयुष्य कधीच बरबाद होते हे सुध्दा कळत नाही. याला जबाबदार काही प्रमाणात आजची सामाजिक तसेच राजकीय परिस्थिती देखील आहे. आजच्या राज्यकर्त्यांनी तरूणांना विकासाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. पण तेच राजकीय नेते तरूणांचा फक्त प्रचारापुरता आणि निवडणुकीपुरताच उपयोग करून घेताना दिसतात.

पण यासाठी आता तरूणांनीच आत्मभान ठेवायला पाहिजे. स्वतःच्या देशासाठी मातृभूमीसाठी, न्याय हक्कासाठी व उज्वल भवितव्यासाठी संघर्ष करायला पाहिजे. थोड्याशा अपयशाने खचून आत्महत्या करणाऱ्या तरूणांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. अपयश हे काही आयुष्य संपवून टाकण्याचे कारण होऊ शकत नाही. जगाचा इतिहास सांगतो की, सुरुवातीला अपयशी ठरलेली माणसे हीच पुढे जाऊन अतिशय प्रभावित आणि यशस्वी ठरली.

आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी भारत हा २०२० सालापर्यंत जगातील महासत्ता व्हावी असे स्वप्न पाहिले होते. ते फक्त तरूणांच्या बळावर. आपल्या तरूणांना ते स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी लढावे लागेल. डॉ. कलामासारखा नावाड्याचा मुलगा सागराऐवजी अंतराळाचा वेध घेतो. अंतराळाचा नावाडी बनतो. नंतर या भारतासारख्या महान देशाचे सुकाणू हाती घेऊन राष्ट्रपती बनतो. अशा कलामांसारख्या माणसाच्या देशात तरूणांना आणखी कोणता आदर्श पाहिजे. ध्येय, चिकाटी, जिद्द ही तरूणाईची ओळख आहे. आपल्या भारतीय तरूणांपुढची महत्वाची समस्या म्हणजे स्पष्ट दृष्टीचा अभाव ही आहे.

तरूणांनी प्रत्येक क्षेत्रात पुढे येऊन जबाबदारी स्विकारणे गरजेचे आहे. भारतासारखा लोकशाही राज्यपध्दती असलेल्या देशात तरूणांनी राजकारणात येऊन देशाच्या विकासाला नेतृत्व देण्याची गरज आहे. ज्या देशात आण्णा हजारेंसारखा सत्तर वर्षांचा वृध्द माणून माहितीचा अधिकार नावाचा कायदा बनवू शकतो संपूर्ण देशाचे राजकारण हादरून सोडू शकतो, त्याच देशातील तरूण काय नाही करू शकत? ग्रामीण भागातील तरूणांनी शिक्षण घेऊन समाजाच्या मूळ प्रवाहात येणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या युगात स्वतःला टिकवले पाहिजे. तरूणांनी जगाबरोबर स्पर्धा करायला शिकले पाहिजे. स्वतः न्यायासाठी झगडायला पाहिजे. कारण आजचा तरूण हाच पुढे भारताचा भावी आदर्श नागरिक होणार आहे. तरूणांनी स्वतः बद्दल अंतर्मुख होण्याची गरज आहे. आपल्या तरूणांनी गौतम बुध्द, स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, भगवान महावीर यासारखे आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वतःचे आयुष्य समृध्द केले पाहिजे. तर यश मिळवण फार अवघड जाणार नाही. जीवन हा एक रणसंग्राम आहे. त्यात लढण्याची जिद्द हवी. कारण आयुष्याची सफलता ही लढण्यात आहे. माणसाला आयुष्यात तीन गोष्टी एकदाच मिळतात. त्या म्हणजे आई, वडील आणि तारूण्य शेवटी आजच्या तरूण पिढीला एवढेच सांगावेसे वाटते.

सगळं काही तुझ्यात आहे
फक्त शोधायला शिक
जे तुझच आहे फक्त
प्रयत्न करायला शिक
एकलव्य तूच आहेस आणि
सिंकदरही तूच होणार
हे जाणायला शिक
प्रबळ इच्छाशक्ती ही सर्वात मोठी
शक्ती आहे
तिला जागवायला शिक
अरे यश तुझच आहे.
फक्त संधीचं सोनं करायला शिक

**प्रिती आनंद जाधव**
एफ.वाय.बी.कॉम

# आजची स्त्री खरंच स्वतंत्र आहे का ?

आजच्या युगामध्ये स्त्री ही पुरूषा एवढीच आघाडीवर असलेली आपल्याला पहावयास मिळते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात ती पुरुषांच्या बरोबरीने काम करताना प्रगती पथावर आहे. अर्थाजनामध्येही ती पुरूषाएवढीच तर काही ठिकाणी त्यापेक्षाही जास्त पुढे दिसते. साहजिकच पूर्वी पेक्षा आताच्या युगात स्त्रीला समाजात मोठे स्थान प्राप्त झाले आहेत. ते तिने स्वतःच्या कर्तृत्वाने, कष्टाने, बुद्धिमत्तेने मिळविलेले आहे यात शंकाच नाही. एकूण सर्वच बाबतीत स्त्रिया ह्या पुरूषांच्या बरोबरीने आघाडीवर आहेत. हे जरी खरे असले तरी या सर्व गोष्टी काही ठराविक वर्गापुरत्या मर्यादित आहे. काही ठराविक स्त्रियांच्या बाबतीत खऱ्या आहेत. स्त्री सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे असे म्हटले तरीही तिच्यावर अन्याय होताना आजही दिसून येतोच आहे. आजही वर्तमान उघडले की जास्तीत जास्त स्त्रियांबाबतच्याच अन्यायाच्या बातम्या जास्त असतात. नवविवाहितेच्या आत्महत्या, सुनेला छळ करून मारले अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची निर्घुण हत्या अशा बातम्याच जास्त असतात.

सुशिक्षित वर्गातही पहिली पत्नी सुगरण, सुस्वभावी, समजूतदार असली तरीही तिला मुलीही झाल्या तरीही तो दोष तिचाच समजून पतीचा दूसरा विवाह लावला जातो. मुलगा व मुलगी होणे हे स्त्रियांच्या हातात नसते हे न कळण्या इतपत समाज मागासलेला आज नाही ना ? तरी पण या ठिकाणी काही गुन्हा नसताना स्त्रीला अन्याय सहन करावा लागतो. साधारणपणे लग्नाला ५-६ वर्षे झाली व घरात पाळणा हलण्याची चिन्हे दिसली नाहीत की, योगी बाबा, डॉक्टर तपासण्या चालू होतात. त्या प्रथम स्त्रीच्याच केल्या जातात. मूल जन्माला येण्यासाठी दोघेही तेवढेच जबाबदार असतात. पण स्त्रीला प्रथम दोष लावण्यात येतो. तिच्यात काही दोष निघाला तर पुरूष या कारणावरून तिच्या संमतीने अथवा तिच्याशी घटस्फोट घेऊन दुसरे लग्न करण्यात सिध्द होतो. पण पुरुषांमध्ये दोष आढळला तर एक तरी स्त्री त्याच्या पासून घटस्फोट घेऊन दुसरे लग्न केल्याचे आपल्याला आढळते का?

ऐन तारूण्यात पतीच्या अपघाती निधनाने विधवा झालेल्या मुली आपण पाहतो. मुल बाळ नसेल तर दुसऱ्या विवाहाचा विचार करावा लागतो. पण जर पदरी लहान एक दोन मुले असतील तर तिला आपले आयुष्य एकटीने काढावे लागते आणि तरीही ती सगळयाचा सांभाळ करत असते. मुलांना व्यवस्थित वाढवून त्यांचे शिक्षण करते. पण हेच जर एखाद्या पुरूषाबाबतीत झाले, त्याची पत्नी अचानक मरण पावली तर एका वर्षाच्या आतच त्याची दुसऱ्या लग्नाची बोलणी सुरु केली जाते. मुलांना कोण सांभाळणार? घरातले कोण करणार ? स्वतःची गरज भागवण्यासाठी दुसरे लग्न करतो. त्यामध्ये त्याचा स्वार्थच असतो. मात्र स्त्री आपल्या पतीच्या प्रेमाखातर त्याच्या आठवणीवर सगळे आयुष्य काढण्यास तयार होते. आपल्या मुलांना मोठे करते. स्वतःचा विचारही ती कधी करत नाही पण पुरूषांचे तसे नसते.

आपला समाजही त्यास तेवढाच जबाबदार आहे एखाद्याची पहिली पत्नी तरूण वयात गेली की, लगेच त्याला वर्षाच्या आत लग्नासाठी प्रस्ताव येतात. मुलांना सांभाळायला घरात लक्ष्मी हवी. एकटा किती दिवस राहणार. पण असा प्रस्ताव तरूण विधवेकडे क्वचितच अपवादाने पाहायला मिळतो. नाही तर तिलाच 'तूच पांढऱ्या पायाची म्हणून नवऱ्याला घालवून बसली' असा आरोप तिच्यावर करण्यात येतो. स्त्री ही लग्न करून तुमच्या घरी आपले माहेर, बहिण-भाऊ, आई-वडील यांना सोडून येते. तुमच्या घराची जबाबदारी उचलते.

तुमच्या मुलांना जन्म देते. त्यांना मोठे करते. वेळ प्रसंगी ती तुमच्या पाठीशी खंबीर उभी राहते. एकटा पुरूष किंवा स्त्री ही फारसा पराक्रम गाजवू शकत नाही. दोघांनाही एकमेकांची साथ हवी असते. हा संसाररूपी रथ एका चाकाच्या साहाय्याने चालवता येत नाही. तरी सुध्दा कायम स्त्रीवरच अन्याय का ? आपला समाज कितीही बदलला तरी स्त्रीवर होणारे अन्याय कधी संपणार नाहीत का ? पेपरमध्ये रोज नवविवाहितेच्या आत्महत्या, सुनेला छळ करून मारले, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची निघुर्ण हत्या अशा बातम्या येणे कधी थांबेल का ? ह्या स्त्री वरील अन्यायला जबाबदार कोण ? तिला कधी न्याय मिळेल कि नाही ? असे अनेक प्रश्न आपल्या आधुनिक समाजातही अनुत्तरीतच राहत आहेत. सर्व क्षेत्रात सतत पुढे जाण्यासाठी धावणारा आपला समाज स्त्रियांच्या बाबतीत मागे का जातो हीच आज आपल्या समाजाची मोठी खंत आहे.

कोणीतरी येईल परिस्थिती बदलेल या आशेवर कधीपर्यंत राहणार आहोत आपण? यासाठी जास्त काही करण्याची पण गरज नाही. आपण प्रत्येकाने आपल्या आजुबाजूला असणाऱ्या स्त्रियांबद्दल मनात आदर ठेवून त्यांना मानापानाची वागणूक दिली तरी खूप फरक पडू शकेल. आपली आई, बहिण, बायको, मुलगी यांना माणूस म्हणून त्यांच्यात भेदभाव न करता वागले तरी खूप काही घडेल. कारण परिवर्तन नेहमी आपल्यापासून सुरु केले तर अनेक प्रश्न सुटतील असे वाटते.

**– तेजस्विनी प्रकाश पवार**
एस.वाय.बी.सी.एस.

# जॉर्ज स्टिफन्सन

इ.स. १८२५ सालाची गोष्ट. इंग्लंडमधील स्टॉक्टन ते डार्लिंगटन या दरम्यान नवीनच बांधलेल्या रेल्वे मार्गाच्या दुतर्फा गर्दी करुन लोक उभे होते.कित्येकजण या नवीनच प्रयोगाची फजिती पाहण्यासाठी आलेले होते.या रेल्वेमार्गावरुन जॉर्ज स्टिफन्सनने विकसित केलेले इंजीन लावलेली चौतीस डब्यांची गाडी धडधडत जाणार होती.या डब्यांपैकी काही डब्यांमध्ये कोळसा होता. तर काही डब्यांमध्ये चक्क माणसे बसलेली होती. स्वतः जॉर्ज स्टिफन्सन इंजिन चालवणार होता. आधी असे अनेक प्रयोग झालेले होते परंतु कधी मार्गच उखडला जाई, तर कधी इंजिनच बंद पडे.

जॉर्जची आज खरी कसोटी होती. गाडीच्या पुढे एक घोडेस्वार दौडत जाणारा होता. गाडीला हिरवा कंदील मिळताच खऱ्याप्रकारे गाडी सुरु झाली. सर्वजण श्वास रोखून पाहत होते. गाडी ताशी ६०८ मैल वेगाने जाऊ लागली. गाडीच्या पुढे धावणाऱ्या घोडेस्वाराला त्याने बाजुला होण्यास सांगितले आणि इंजिनात भरपूर वाफ सोडली. इंजिनाचा वेग वाढुन तो १५ मैलांपर्यंत जाऊन पोहचला. जॉर्जचा प्रयोग खुपच यशस्वी झाला. जमलेल्या सर्वच लोकांनी त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

इंग्लडमधील विलॅम या गावी ९ जून १७८१ रोजी जॉर्जचा जन्म झाला. त्याचे वडील खाणीत फायरमन होते. तुटपुंजा पगार आणि घरात सहा मुले त्यामुळे जॉर्ज आणि त्याच्या भावंडांना शिक्षण घेणे

शक्यच नव्हते; परंतु जॉर्जच्या आई-वडिलांनी त्याच्यावर चांगले संस्कार केले. त्याच्यामध्ये महत्वाकांक्षा निर्माण (जागृत) केली. लहानपणापासून गाई हाकण्याचे काम करून त्याने थोडेफार पैसे मिळवले. काही दिवसांनी त्याला व त्याचा भाऊ जेम्स स्टिफन्सन याला खाणीत काम मिळाले परंतु जॉर्जचे काही समाधान होत नव्हते. कारण त्याला इंजिनियर व्हायचे होते. अखेर त्याची इच्छा पुर्ण झाली. एका खाणीत तो इंजिनीयर म्हणुन रूजू झाला. इंजिने चालविणे, देखभाल करणे हे त्याचे काम होते. इंजिन बंद पडले तर तो स्वतःच ते दुरूस्त करीत असे. त्याला बोल्टन आणि वॉट यांचे सहाय्य लाभले. त्याचप्रमाणे जॉर्ज स्टिफन्सन याला बोल्टन आणि वॉट यांनी बनविलेल्या इंजिनांविषयी अधिक माहिती मिळवायची होती. जॉर्ज स्टिफन्सन हा नाईट स्कुलला जाऊ लागला. थोड्या अवधितच त्याने खुप प्रगती केली. नोकरीत त्याने ब्रेकमन म्हणून बढती मिळवली.

नियमित कमाईला जोड म्हणून तो चपला दुरूस्त करण्याचे काम करू लागला. अशाच एका दुरूस्तीला आलेल्या चपलांच्या मालकिणीशी त्याचे लग्न झाले. दुःदैवाने त्याच्यावर अनेक आघात झाले. त्याची पत्नी वारली. त्याच्या वडिलांचा अपघात होऊन त्यांचे डोळे गेले परंतु जॉर्ज स्टिफन्सन हा डगमला नाही. त्याने त्याच्या वडिलांची सर्व कर्जे फेडली. आई-वडिलांना घेऊन तो किलींगवर्थला आला. तेथे तो खाणीतील पाणी उपसायचा. पंप बंद पडल्यामुळे सर्वत्र पाणी भरले. काम सोडून सर्व कामगारांना बाहेर पडावे लागले. भल्या-भल्या इंजिनिअरांना तो पंप चालू करता येईना.

जॉर्ज स्टिफन्सनने तो पंप चालु करण्याचे आव्हान स्विकारले. आठवड्याभरातच त्याने पंप चालु केला आणि काम पुन्हा चालु झाले. आपला एकुलता एक मुलगा रॉबर्टला चांगले शिक्षण देण्याचे त्याने ठरविले. त्यासाठी लागणारा पैसा त्याने घड्याळे वगैरे दुरूस्त करून मिळवला. न्यूकासल येथे पिता-पुत्र दोघेही एकत्र शिक्षण घेऊ लागले.

एक काळ असा येईल की, ''पूर्ण जगभरात सर्व वाहनांत रेल्वे हे वाहतुकीचे सर्वात प्रभावी साधन होईल,'' असा विश्वास व्यक्त करणाऱ्या जॉर्ज स्टिफन्सनचे शब्द अक्षरशः खरे झाल्याचे दिसून येते. असा हा सुसंस्कृत संशोधक १२ ऑगस्ट १८४८ साली हे जग सोडून निघुन गेला.

**- आरती बाबासाहेब ताडे**
माजी विद्यार्थीनी

# कोरोनाचा भारत देशावर झालेला परिणाम

आजपर्यंत जगात अनेक संकटे आली. यामध्ये पहिले महायुद्ध, दुसरे महायुध्द यांनी मानवी मनात दहशत निमाण केली. तसेच प्लेग, चिकनगुणिया, इबोला, व्हाईरस, त्सुनामी, महापूर यांसारख्या आपत्तीनींही मानवी जीवनावर विपरित परिणाम केला. त्यानंतर कोवीड-१९ (कोरोना) हा संसर्गजन्य रोग संपूर्ण जगात वाऱ्याच्या वेगाने पसरला. त्यामुळे संपूर्ण जगात हाहाकार माजला. या संसर्गजन्य रोगाची सुरुवात चीन मधील वुहान या शहरातून झाली. मानवी संसर्गातून हा रोग जगात पसरु नये म्हणुन जागतिक आरोग्य संघटनेने जगातील सर्व देशांना सुरक्षित राहण्यासाठी आवाहन केले. भारत देशातील सर्वच गोष्टींवर या रोगाचा प्रार्दुभाव मोठ्या प्रमाणात झाला. मात्र प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. त्याप्रमाणे कोरोनाचे भारतावरही काही चांगले वाईट परिणाम दिसून आले ते आपण पाहुया.

**आर्थिक परिणाम –**

कोरोना व्हाईरसमुळे अनेक छोटे मोठे व्यवसाय, उद्योगधंदे, ठप्प झाले. पर्यायाने त्याचा परिणाम आर्थिक गार्ष्टींवर फार मोठ्या प्रमाणात झाला. संपूर्ण जगच एकाच वेळी बंद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सर्वच देशांना सहन करावे लागले. जवळ जवळ सर्वच देशांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली. अचनाक आलेल्या या संकटामुळे रोजंदारीवर कामाला जाणाऱ्या लोकांचा जो वर्ग आहे त्यांचे सर्वात जास्त हाल झाले. कारण काम बंद असल्यामुळे त्यांचे उत्पन्न एकदम शून्य झाले. त्याचा परिणाम असा झाला की, त्याला आपल्या दैनंदिन गरजा भागवणेही कठीण झाले. तसेच मध्यवर्गीय, सरकारी नोकरदार या लोकांचे देखिल तसेच हाल झाले. कारण घर, गाडी व इतर गोष्टींसाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते भरण्यासाठी जरी मुदत मिळाली असली तरी सरकारकडे त्यांना पगार देण्यासाठी रक्कम शिल्लक नव्हती. तसेच या कोरोनाचा मोठे व्यावसायिक, उद्योगपती यांना देखिल थोड्या प्रमाणात का होईना झळ बसली. एकंदर सर्वच आर्थिकस्तरावर कोरोनाचा दुष्परिणाम झालेला दिसून आला.

**बेरोजगारी –**

या काळात अनेक छोट्या मोठ्या कंपन्या कायमच्या बंद झाल्या. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या लोकांना कामावरून काढून टाकण्यात आले किंवा त्यांना तात्पुरते कामावरून बंद करण्यात आले. या काळात अनेक आय.टी.कंपन्या बंद झाल्यामुळे लोकांच्या नोकऱ्या गेल्या. अगोदरच भारत देशामध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारी होती. त्यातच या कोरोनामुळे आणखी भर पडून मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाली.

शैक्षणिक दुष्परिणाम –

शैक्षणिक क्षेत्रावर देखिल कोरोनाचा फार मोठा दुष्परिणाम झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षाच घेता आल्या नाही. परीक्षा न घेता प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पास करून पुढील वर्गात ढकलण्यात आले. तसेच पदवीच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घ्याव्या लागल्या. पास केलेल्या विद्यार्थ्यांचे काय भवितव्य घडणार ? त्यांना साधी नोकरीदेखील मिळणार आहे का ? पर्यायाने त्यांचे नुकसान होणार आहे. तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे देखिल असेच झाले. याचा परिणाम त्यांच्या गुणवत्तेवर नक्कीच होणार आहे. याशिवाय अनेक विषयात पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचीही अशीच परिस्थिती झालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये अजुनही शाळा, महाविद्यालये सुरु झालेली नाहीत. शाळा, महाविद्यालये उशिरा सुरु झाल्यावर ज्या विद्यार्थ्यांना सेमिस्टर पध्दतीचा अभ्यासक्रम आहे, त्यांच्या परीक्षा घेणे कोणत्या वेळेत शक्य होईल ? तसेच विद्यार्थी घरात बसून बसून आळशी वृत्तीचे झाले आहेत. काही शाळांनी प्रवेश प्रक्रिया पुर्ण करून ऑनलाईन वर्ग सुरु केले आहेत परंतु ऑनलाईनमुळे विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवणे कठीण झाले आहे. कोरोनामुळे जास्त दिवस सुट्टीचे गेल्यामुळे अभ्यास करण्याबाबत

विद्यार्थ्यांची मानसिकता राहिलेली नाही. यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. शैक्षणिक क्षेत्रावर हा खुप मोठा दुष्परिणाम झालेला आहे.

मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी अशा विविध भाषेतील साहित्याची ओळख व्हावी. साहित्याच्या वाचनातून त्यांना समाज मन आत्मसात व्हावे. तसेच विद्यार्थ्यांच्या ठायी असणाऱ्या विविध साहित्य गुणांचा विकास व्हावा; यासाठी महाविद्यालयात वाङ्मय मंडळ प्रत्येक वर्षी विविध उपक्रम घेत असते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये दि. ४/९/२०१९ रोजी 'My Campus Stars' ही स्पर्धा दिव्य मराठी वृत्तपत्र, माय.एफ.एम., वासन ग्रुप यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी वाङ्मय मंडळ व सांस्कृतिक विभागाने विशेष पुढाकार घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, एकपात्री, मिमीक्री आदी कला प्रकार सादर केले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यानंतर दि. १५/९/२०१९ रोजी लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांचे जयंती निमित्त महाविद्यालयात वाङ्मय मंडळ व सांस्कृतिक विभाग यांचे संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकुण ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व ततीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमांत प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, भेंडे येथील जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक शिंदे तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांचे शुभहस्ते स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी श्री. काकासाहेब शिंदे व प्राचार्य डॉ. अशोक शिंदे यांनी लोकनेते मारूतरावजी घुले पाटील साहेब यांच्या जीवनचरित्राचा परिचय करून दिला. त्याचबरोबर स्पर्धेतील सर्व विद्यार्थ्यांचे कौतुकही केले. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये वादविवाद, वक्तृत्वकला या गुणांचा विकास व्हावा यासाठी वाङ्मय मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमास सांस्कृतिक विभागाचेही सहकार्य मिळाले. त्यामुळे चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर जि. पुणे येथील छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत कु. मयुरी शरद नरवडे व कु. सविता बबन नन्नवरे या विद्यार्थीनींनी स्पर्धेत सहभागी होऊन द्वितीय क्रमांक मिळविला. याबरोबरच महाविद्यालयात दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या क्षितिज अंकासाठी विद्यार्थ्यांना लेखनासाठी प्रोत्साहित करून मार्गदर्शन करण्यासाठी वाङ्मय मंडळ सदोदित कार्यरत असते. त्यासाठी प्राचार्य डॉ. टी.एम. वराट व वाङ्मय मंडळातील सर्व सदस्यांचे अनमोल सहकार्य मिळाले त्याबद्द्ल सर्वांचे आभार...

**– प्रा. डॉ. के. आर. पिसाळ**
वाङ्मय मंडळ प्रमुख

# सांस्कृतिक मंडळ अहवाल

सांस्कृतिक विभागाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून महाविद्यालयात निबंधलेखन, रांगोळी, वकृत्व, काव्यवाचन, अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या विभागाअंतर्गत उपक्रमामुळे त्यांच्यातील नेतृत्वगुण सभाधारिष्टपणा निर्माण होऊन आत्मविश्वास बळावला व अनेक नैतिक मूल्ये वृध्दिगत झाली.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्यावतीने घेण्यात आलेले कार्यक्रम पुढील प्रमाणे.

| अ.नं. | दिनांक | उपक्रम/कार्यक्रम | प्रमुख पाहुणे/अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १. | २१/०६/२०१९ | आंतरराष्ट्रीय योग दिन | मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट |
| २. | ०८/०७/२०१९ | स्व. लोकनेते मारूतरावजी घुले पाटील १७ वी पुण्यतिथी | मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट |
| ३. | ०५/०९/२०२० | शिक्षकदिन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती | मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट |
| ४. | १५/०९/२०१९ | स्व. लोकनेते मारूतरावजी घुले पाटील ८९ वी जयंती कार्यक्रम | मा.श्री. काकासाहेब शिंदे<br>मा.प्राचार्य डॉ. अशोकराव शिंदे<br>मा. प्राचार्य डॉ.टी.एम.वराट |
| ५. | १५/०९/२०१९ | निबंधलेखन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा | मा.श्री. काकासाहेब शिंदे<br>मा.प्राचार्य डॉ. अशोकराव शिंदे<br>मा. प्राचार्य डॉ.टी.एम.वराट |
| ६. | ०२/१०/२०१९ | राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती | मा.प्रा.डॉ. सुनिल कवडे<br>मा.प्रा.डॉ. शरद बोरूडे<br>मा.प्राचार्य डॉ.टी.एम.वराट |
| ७. | ०१/१२/२०१९ | जागतिक एड्स दिन जनजागृती | मा.डॉ. प्रविण अहिवळे,<br>डॉ. म्हस्के मा.प्राचार्य<br>डॉ.टी.एम. वराट |
| ८. | २१/१२/२०१९ | अक्षर करंडक राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा सहभाग महाविद्यालय विद्यार्थी संघ | अक्षर विचार प्रतिष्ठान अहमदनगर |
| ९. | २३/१२/२०१९ | महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सहभाग महाविद्यालय विद्यार्थी संघ | अहमदनगर महाकरंडक माऊली सभागृह |

| अ.नं. | दिनांक | उपक्रम/कार्यक्रम | प्रमुख पाहुणे/अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १०. | ०३/०१/२०२० | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती | मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट |
| ११. | ०३/०१/२०२० | छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय आंतरमहा-विद्यालयीन वादविवाद स्पर्धा सहभाग कु.मयुरी शरद नरवडे कु. सविता बबन नन्नवरे (द्वितीय क्रमांक) | चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, ता. शिरूर, जि. पुणे |
| १२. | १४/०१/२०२० | भूगोल दिन | मा.प्रा.डॉ. आनंद पंडित<br>मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट |
| १३. | २०/०१/२०२० | वाचन संस्कृती लोपपावत चालली आहे/नाही आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा. कु. मयुरी शरद नरवडे कु. सविदा बबन नन्नवरे (सहभाग) | न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगांव जि.अहमदनगर |
| १४. | ११/२/२०२० ते १२/२/२०२० | विविध पारंपारिक दिवस | मा. प्राचार्य डॉ.टी.एम. वराट |
| १५. | १९/०२/२०२० | छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम | मा.पा.डॉ.नारायणराव म्हस्के<br>मा.प्रा. संतोष वीरकर<br>मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट |

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक मंडळाचे सर्व सदस्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवकवृंद व विद्यार्थी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

**– प्रा.एन.एन. झिंज**
अध्यक्ष, सांस्कृतिक मंडळ

## सांस्कृतिक समिती वर्ष – २०१९-२०

| अ.क्रं. | प्राध्यापकाचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा.एन.एन. झिंज | अध्यक्ष |
| २ | प्रा.डॉ.के.आर.पिसाळ | सदस्य |
| ३ | प्रा.पी.ए.फटांगरे | सदस्य |
| ४ | प्रा.एस.व्ही.मरकड | सदस्य |
| ५ | प्रा.एस.बी.दहातोंडे | सदस्य |
| ६ | प्रा.के.बी.ताके | सदस्य |
| ७ | प्रा.जी.एस.सोनावणे | सदस्या |
| ८ | प्रा.बी.एस.पवळे | सदस्या |
| ९ | प्रा.पी.एस.साबळे | सदस्या |
| १० | प्रा.आर.आर. राजपुरे | सदस्या |

# राष्ट्रीय सेवा योजना

मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत एकूण १०० (शंभर) स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी आहेत. त्याद्वारे महाविद्यालयात वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयीन अभ्यास क्रमाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी, सामाजिक समस्या विषयी जाणीव जागृती निर्माण होऊन सामाजिक व वैयक्तिक समस्या सोडविण्यास ते सक्षम व्हावेत, विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, त्यांच्यातून जबाबदार नागरिक निर्माण व्हावेत या उद्देशाने महाविद्यालयात रासेयो विभाग कार्यरत आहेत. महाविद्यालयातील रासेयो विभागामध्ये नियमित कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रम व उपक्रम प्राचार्य डॉ. टी. एम. वराट यांच्या मार्गदर्शनानूसार घेण्यात आले. त्यामध्ये स्वच्छता पंधरवडा, स्वातंत्र्य दिन, शिक्षक दिन, लोकनेते मारूतरावजी घुले पाटील जयंती, स्वामी विविकानंद जयंती, युवा सप्ताह, हुतात्मा दिन, प्रजासत्ताक दिन हे कार्यक्रम घेण्यात आहे.

महाविद्यालयामध्ये दि १३/०८/२०१९ रोजी स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालय परिसर, वर्ग खोल्या, प्रॅक्टिकल लॅब, ग्रंथालय, महाविद्यालय प्रांगणाची स्वच्छता करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार दि. १४/०८/२०१९ रोजी महाविद्यालयात रासेयो विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी मदत फेरी काढून रु. १५८३६/- (पंधरा हजार आठशे छत्तीस रूपये) जमा केले. ही रक्कम बँकेद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खात्यात जमा करून पोहच पावती घेतली. दि. २८/०८/२०१९ रोजी महाविद्लायामध्ये प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनानूसार व रासेयो स्वयंसेवक यांच्या मदतीने वृक्षारोपन करण्यात आले.

गुरुवार दि. ५/९/२०१९ रोजी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते. सोमवार दि. १५/९/२०१९ रोजी लोकनेते मारूतरावजी घुले पाटील जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. अशोकराव शिंदे व कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर मा. काकासाहेब शिंदे यांनी भूषविले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांनी केले. मंगळवार दि. २४/९/२०१९ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा येथील डॉ. किशोर धनवटे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते.

गुरुवार दि. ३/१०/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर येथील महात्मा गांधी अध्ययन केंद्राचे समन्वयक डॉ. सुनील कवडे व ETI प्रमुख डॉ. शरद बोरूडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते.

दि. ०६/१२/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये जागतिक एड्स दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शुक्रवार दि. ०३ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयामध्ये क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट व सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवक वृंद व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

शै. वर्ष २०१९-२० मध्ये विशेष श्रमसंस्कार शिबिर चिलेखनवाडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे दि. ०३ जानेवारी २०२० ते दि. ०९ जानेवारी २०२० या कालावधीत घेण्यात आले. या शिबिरासाठी ५० स्वयंसेवकाची निवड करण्यात आली होती. या शिबिरात वनराई बंधारा, वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन जनजागृती, ग्राम स्वच्छता, व्यसन मुक्ती, बेटी बचाओ अभियान, ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची स्वच्छता आदि उद्दिष्टे ठेऊन कार्यक्रम घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन श्री. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडे व जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव ने संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भेंडा येथील लोकनेते मारूतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मा. आ.श्री. पांडुरंग अभंग साहेब हे होते. तसेच या कार्यक्रमास चिलेखनवाडी गावचे सरपंच मा.श्री. भाऊसाहेब सावंत, उपसरपंच मा.श्री. नाथा गुंजाळ, लोचनाबाई ऑक्सीजन व नायट्रोजन गॅस उत्पादक कंपनीचे उद्योजक मा. बी.डी.पुरी साहेब, प्राचार्य डॉ.टी. एम. वराट, प्राचार्य डॉ. बी.जे. अप्पाराव, प्राचार्य डॉ.डी.एन. वाबळे, मुख्यध्यापक श्री. सुरेश सानप, ग्रामस्थ, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवक वृंद व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. शिबीर काळात चिलेखनवाडी गावातील मुख्य रस्ते, मंदिर परिसर, प्राथमिक शाळा, मज्जिद परिसर, वृक्ष लागवड, आरोग्य केंद्र ग्रामसर्वेक्षण आदि कामे करण्यात आली. अखेर शेवटच्या समारोप दिनी रासेयो विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे समाज प्रबोधन केले.

विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ ०९/०१/२०२० रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते मारूतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना भेंडे चे जेष्ठ संचालक मा. देसाई देशमुख हे होते. तसेच या प्रसंगी प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, प्राचार्य डॉ. बी. जे. अप्पाराव, प्राचार्य डॉ. डी.एन. वाबळे, सरपंच मा.श्री. भाऊसाहेब सावंत, उद्योजक मा.बी.डी.पुरी साहेब, ग्रामस्थ, सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवक वृंद व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. हे श्रमसंस्कार शिबीर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय अहमदनगर, जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय भेंडे व लोकनेते मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालय दहीगाव ने यांचे संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या संपन्न झाले.

शै. वर्ष २०१९-२० मध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत घेण्यात आलेल्या उपक्रम व कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवक वृंद व रासेयो स्वयंसेवक यांचे अनमोल सहकार्य लाभले.

**- प्रा. सुभाष काळे**
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी

# विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळांतर्गत शैक्षणिक २०१२-१३ पासून महाविद्यालयात 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' राबविण्यात आली. या काळामध्ये प्राध्यापकांची एक समिती नेमण्यात आली. सदरील काळामध्ये महाविद्यालयामध्ये अनेक उपक्रम राबविले गेले. वृक्षारोपण कार्यक्रम, विद्यार्थ्यांची सुरक्षितता या विषयी मार्गदर्शन, विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास, निर्भय कन्या अभियान तज्ञ प्राध्यापकांची व्याख्यानमाला आयोजन विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण याविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात आले. या काळामध्ये प्रा. डॉ. के. आर. पिसाळ, प्रा. एस.बी.दहातोंडे यांनी विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून समर्थपणे कार्य केले.

सन २०१९-२०२० या वर्षामध्ये 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापकांची एक समिती स्थापन करण्यात आली. यामध्ये 'कमवा शिका योजनेत विद्यार्थ्यांची निवड करताना विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यातून जे विद्यार्थी आर्थिकदृष्या दुर्बल आहेत अशांची निवड करण्यात आली.

या विद्यार्थ्यांना विविध विभागामध्ये कामे विभागून देण्यात आली. विज्ञान प्रयोगशाळा, संगणक विभाग ग्रंथालय, ऑफीस, महाविद्यालय परिसर अशी प्रत्येक विभागात विद्यार्थ्यांनी कामे केली. यामधून विद्यार्थ्यांनी झाडे लावणे. त्यांची निगा राखणे, परिसर स्वच्छ करणे आदी कामांचा समावेश आहे. विद्यार्थी विकास मंडळाने ठरवून दिलेल्या निकषानुसार विद्यार्थ्यांना प्रती तास ४५ रूपये याप्रमाणे त्यांचे महाराष्ट्र बँकेत खाते उघडून त्यांनी केलेल्या कामांचे पैसे त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त ३ तास कामे देण्याचे नियम आहेत. तसेच या योजनेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना २ तास काम देण्यात आले. प्रती महिन्याप्रमाणे त्यांची रक्कम त्यांना अदा करण्यात आली.

विद्यापीठाने वेळोवेळी सांगितलेल्या सूचनाचे पालन करुन विविध कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आले. मराठी भाषा संवर्धन, लोकशाही दिन, मातृभाषा दिन, स्वच्छता पंधरवडा आदी कार्यक्रमाचा समावेश आहे. या योजनेमुळे आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना स्वावलंबित्वाचे धडे आणि शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत आहे. तसेच महाविद्यालय अशा विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासोबतच त्यांच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून त्यांना रोजगार कसा प्राप्त होईल यासाठी विविध क्षेत्रातील कंपन्या, बँका यांचे रोजगार मेळावे यांचे आयोजन करत आहे.

**- प्रा.डॉ.आर.ए. नेटके**
विद्यार्थी विकास मंडळ

# बहिःशाल विभाग

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय नागापूर, अ.नगर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील बहिःशाल केंद्रांर्तगत सन २०११ पासून डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे तर सन २०१८-१९ पासून 'एक दिवसीय जेष्ठ नागरिक शिबीराचे' आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी, विविध सामाजिक समस्यांविषयी जाणिव जागृती निर्माण होऊन सामाजिक व वैयक्तिक समस्या सोडविण्यास ते सक्षम व्हावेत, त्यांच्यातून जबाबदार नागरिक निर्माण व्हावेत या उद्देशाने महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यान माले अंतर्गत अनेक तज्ज्ञ चार मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित केली.

महाविद्यालयात दि. २१/०८/२०१९ ते २३/०८/२०१९ या कालावधीत 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यान मालेचे' आयोजन करण्यात आले. मा.श्री. पवार संतोष गणपतराव यांनी 'एच.आय.व्ही.एड्स व युवकांचे आरोग्य' मा.श्री. दरोडे संभाजी कोंडीबा यांनी 'संत हे चालते बोलते विद्यापीठ, तर मा. श्री. गजानन के. शिंदे यांनी 'आजचा युवक आणि संस्कृती' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच दि. १३/०९/२०१९ रोजी महाविद्यालयात 'एक दिवसीय जेष्ठ नागरिक शिबीराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे जेष्ठांच्या आरोग्य विषयक समस्या, राहणीमान, सकस आहार, कुटूंबात मिळणाऱ्या सोईसुविधा, ध्यान धारणा, सकारात्मक जीवनशैली, आधुनिक उपचार पध्दती, वैद्यकिय सुविधा, शासन राबवत असलेल्या विविध योजना इ. विषयी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले.

या शिबीरांतर्गत मा.प्रा. खरात बाबासाहेब यांनी 'मन करा रे प्रसन्न', मा.श्री. मेहेर रतीलाल श्रीमल यांनी 'शारिरीक शिक्षण, आरोग्य, योगा आणि आहार' तसेच मा. श्री. सुरेंद्र गुजराथी यांनी 'वाह ! क्या बात है !' या विषयावर जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले.

वरिल उपक्रमांबरोबरच महाविद्यालयामध्ये परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावे. शेतकऱ्यांनाही आपल्या समस्यांचे निराकरण करून घेता यावे या उद्देशाने दि. २७/१२/२०१९ रोजी ''माती आणि परीक्षण' या गरजेवर आधारित उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाद्वारे तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विविध स्लाईड्सच्या माध्यमातून शेतकऱ्यांना माती आणि पाणी परीक्षणाचे महत्व, विविध पिके, खते, खतांचा वापर कसा करावा. किटकनाशके, तणनाशके, अंतर्गत पिके, सेंद्रिय खते निर्मिती कशी करावी, पाण्याचा वापर कसा, किती प्रमाणात करावा, व तसेच शेतकऱ्यांचे आरोग्य, सकारात्मक जीवन कसे जगावे अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

'माती आणि पाणी परीक्षण' या उपक्रमांतर्गत मा.प्राचार्य डॉ. के.के. देशमुख (संगमनेर महाविद्यालय संगमनेर) यांनी 'माती परीक्षण' तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी, जि.अ.नगर येथील मृदाशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए.डी. कडलग यांनी 'एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन' या विषयावर, त्याच प्रमाणे 'सुजलाम् क्रॉप केअर' चे संस्थापक मा.डॉ. मधुकर हेगडे यांनी शेती व्यवसायात सेंद्रिय कबीचे महत्त्व' या विषयावर, त्याचप्रमाणे मा.प्रा. डॉ. वायाळ पुरुषोत्तम (लालबहादुर शास्त्री महाविद्यालय परतूर, जि. जालना) यांनी 'ग्राम विकास' या विषयावर शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचा समन्वयक मा.प्राचार्य डॉ. सासवडे आर.आर. यांच्या हस्ते महाविद्यालयातील 'माती व पाणी परीक्षण' विभागाचे उद्घाटन करण्यात आले.

वरील तीनही उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर वृंद यांचे सहकार्य लाभले.

**– प्रा. सोनवणे जी.एस.**
बहि:शाल केंद्र कार्यवाहक

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

आजच्या जगात प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली आहे. देशातील अनेक महत्त्वाच्या पदावर स्पर्धा परीक्षेतूनच नियुक्ती केली जाते. त्यामुळे स्पर्धा परीक्षा देऊन त्यातून उच्च अधिकारी होण्याचे स्वप्न अनेक विद्यार्थी पाहत असतात. त्यासाठी योग्य मार्गदर्शन व अभ्यास साहित्य उपलब्ध असणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा केंद्राची सुरुवात केली.

या परीक्षा केंद्राअंतर्गत महाविद्यालयात दरवर्षी एकुण ५० विद्यार्थ्यांची निवड केली जाते. तसेच स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने वर्षभर महाविद्यालयातील तसेच बाहेरील तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या उपलक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी याची माहिती मिळते. तसेच प्रथम वर्षापासून ते पदवी मिळेपर्यंत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनामुळे अभ्यासाचे नियोजन करता येते.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन पी.एस.आय. मनिषा सुभाष शिंदे यांचे शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते. यावेळी मनिषा शिंदे यांनी 'स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी' या विषयावर विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. तसेच दि. १७/२/२०२० रोजी युनिक ॲकॅडमीच्या सहकार्याने प्रा. नारायण पाटील यांनी 'स्पर्धा परीक्षेतील अभ्यासाचे नियोजन' या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने घेण्यात आलेल्या नियमित तासिका व कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांचे अनमोल सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी पदवी अभ्यासक्रमाबरोबरच स्पर्धा परीक्षा केंद्राचा उपयोग करून आपले करिअर घडवावे असे मनापासून वाटते.

**– प्रा. पी.एस. साबळे**
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रमुख

# प्रसिध्दी विभाग

आजच्या या आधुनिक युगातही ज्ञान, माहीती, संपर्क आणि प्रसिध्दी माध्यमातून अधिकाधिकांचे अधिकतम कल्याण साध्य करण्यासाठी तसेच अधिकाधिकांना अधिकाधिकांशी जोडण्यासाठी व संबंधित घटकात परस्परांविषयी विश्वासार्हता निर्माण करण्याबरोबरच सामूहिक शैक्षणिक विकासाच्या योजना अखेरच्या घटकांपर्यंत पोहचवण्यात सामाजिक शिक्षण साकारण्यात यशाचा आलेख सूचविण्यात तसेच लोकशाही शासनप्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी भारतीय प्रसार व प्रसिध्दी माध्यमाची भूमिका प्रारंभापासूनच महत्वपूर्ण राहिली आहे. महाविद्यालयीन विविध कार्यक्रमाची प्रसिध्दी होण्यासाठी विद्यार्थी व जनसामान्यांत रूजविण्यासाठी प्रसिध्दी विभाग महत्वाची भूमिका बजावत असतो.

महाविद्यालय स्थापनेपासून हा विभाग कार्यरत आहे. या विभागाअंतर्गत महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षामध्ये होणाऱ्या महाविद्यालयीन विविध उपक्रमांना प्रसिध्दी दिली जाते. स्थानिक वर्तमानपत्रांत महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा घोषवारा, फोटो, बातमी देण्यात येते. ज्या विभागाचा उपक्रम आहे किंवा कार्यक्रम घेतला आहे, त्या विभागाकडून त्या विभागाची सविस्तर प्रेस नोट तयार करून प्रसिध्दी विभागाकडे दिल्यानंतर वर्तमानपत्रामध्ये बातमी दिली जाते.

सदर कामासाठी इमेज फोटोग्राफर श्री. अशोक मुकिंदे बाबा मुकिंदे तसेच प्रा.डॉ.के.आर. पिसाळ, प्रा.एस.बी. दहातोंडे, प्रा.एल.एस. कराळे, श्री. पी.व्ही.दळवी यांची मदत घेतली जाते. सदर बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर विद्यार्थी नोटीस बार्डला (प्रसिध्दी विभागात) लावली जाते. अशाप्रकारे बातमी कात्रण फाईल महाविद्लायाच्या स्थापनेपासून तयार करून ठेवली आहे. **गेल्या १० वर्षातील महाविद्यालयाच्या १५० पेक्षा जास्त विविध उपक्रमांच्या बातम्यांचे कात्रण संग्रहित आहे.** तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रम व कार्यक्रमांचे फोटो संग्रहित करून महाविद्यालयीन वार्षिक अंक 'क्षितिज' यांमध्ये समाविष्ट करून उपक्रमांची माहिती दिली जाते.

या विभागाअंतर्गत पत्रकारांचाही सन्मान केला जातो. भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हाअध्यक्ष पत्रकार श्री. बाळासाहेब जाधव, अहमदनगर जिल्हा कार्याध्यक्ष पत्रकार श्री. दिपक खोसे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघटना शेवगांव तालुका सरचिटणीस पकार श्री. शंकर मरकड, इलेक्ट्रॉनिक मिडीया पत्रकार श्री. अशोक वाघ यांचा पत्रकार दिनानिमित्त महाविद्यालयाकडून प्राचार्य डॉ.डी.एम. वराट यांच्या शुभहस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला. व प्राध्यापक मरकड एस.व्ही. यांच्याकडून 'क्षितिज' वार्षिक अंक सप्रेम भेट दिला. तसेच लोकमतचे उपसंपादक पत्रकार श्री. अण्णासाहेब नवथर, पत्रकार श्री. संजय भालेराव, सकाळचे छायाचित्रकार पत्रकार श्री. दत्ता इंगळे, पत्रकार महेश निकम (नेवासा) दैनिक प्रभात उपसंपादक पत्रकार श्री. रविंद्र कदम यांचे विशेष सहकार्य मिळत असते. या विभागामुळे सर्व महाविद्यालयीन शैक्षणिक उपक्रमांना प्रसिध्दी दिली जाते. महाविद्यालयाचा हा अनमोल ठेवा दरवर्षी प्रसिध्दी विभागाकडून संग्रहित केला जातो. या कामी प्रसिध्दी विभागातील सर्व सदस्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य मिळते.

**–प्रा. एस.व्ही. मरकड**
प्रसिध्दी विभाग प्रमुख

# महिला तक्रार निवारण समिती

महिला तक्रार निवारण समिती शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये स्थापन करण्यात आली. या समिती अंतर्गत मुलांच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्येवर उपाय करून त्यांना शिक्षणास प्रवृत्त केले जाते. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यार्थींनींच्या समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले गेले. विशेषतः महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा तसेच मुलीच्या वैयक्तिक अडचणी याची दखल महिला तक्रार समितीद्वारे घेतली जाते.

महाविद्यालयातील विद्यार्थींना परिसरातून छेडछाड करण्याबाबत कोणताच त्रास होऊ नये यासाठी वेळोवेळी जिल्हयाचे दामिनी पथक व निर्भया पथक बोलविण्यात येते. अशा पध्दतीने महिला तक्रार निवारण समिती मुलीच्या समस्येची दखल घेऊन नियमानुसार कार्यवाही करते.

दि. २९/०८/२०१९ रोजी विद्यार्थीनींना निर्भयकन्या अंतर्गत सक्षम बनविण्यासाठी प्रमुख व्याख्याते ''पी.एस.आय. श्रीमती कल्पना चव्हाण'' पी.एस.आय. दामिनी पथक अहमदनगर यांनी 'स्वसंरक्षण आणि सामाजिक जागृती' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच महिला तक्रार निवारण समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## महिला तक्रार निवारण समिती

| अ.क्रं. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ.टी.एम.वराट | अध्यक्ष |
| २ | प्रा. पाऊलबुध्दे ए.आर. | प्रमुख |
| ३ | प्रा. साबळे पी. एस. | सदस्य |
| ४ | प्रा. पवळे बी. एस. | सदस्य |
| ५ | प्रा. सोनवणे जी.एस. | सदस्य |
| ६ | कु. निमसे एस. | सदस्य |
| ७ | कु. पाटोळे टी.पी. | सदस्य |
| ८ | कु. भोर पी.बी. | सदस्य |

# विज्ञान मंडळ

मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड, दृष्टिकोन, वैज्ञानिक संशोधन, प्रकल्प साहित्य यामध्ये रूची निर्माण होऊन त्यांचा बौध्दिक विकास होण्यासाठी विज्ञानविषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शै.वर्ष २०१८-१९ यामध्ये दि. ११/९/१८ रोजी महाविदयालयात विज्ञान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले विज्ञान मंडळाचे उद्घाटन डॉ. व्ही.के.धस (भौतिक शास्त्र विभागप्रमुख न्यु. आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, अहमदनगर) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट यांनी भूषविले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक संकल्पना वृध्दिगत होईल असे मोलाचे मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे विज्ञानदिनाचे औचित्य साधून विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा विद्यार्थ्यांकरीता आयोजित करण्यात आली होती. तसेच विद्यार्थ्यांनी विज्ञान उपकरणे व प्रतिमाने याचे प्रदर्शन सादर केले. यामध्ये क्विज कॉम्पेटिशन इंटरनॅशनल इयर ऑप द पिरॉडिक टेबल स्पर्धेचेही आयोजन केले होते. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला.

दि. २८/२/२०२० रोजी महाविद्यालयात 'विज्ञान दिन' सादरा करण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एस.बी. निमसे होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान मंडळ प्रमुख प्रा. ए.आय. शेख यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.पी.एम.कुऱ्हाडे यांनी केले. प्रा. एस.डी. अबक यांनी आभार मानले. विज्ञान मंडळातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धामधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विजेत्यांचे प्रमुख पाहुणे डॉ. एस.बी. निमसे व अध्यक्ष प्राचार्य डॉ.टी. एम. वराट यांनी स्मृतिचिन्ह व पारितोषिक देऊन गौरविले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ.एस.बी. निमसे यांनी विद्यार्थ्यांना 'भविष्यातील विज्ञान शाखेतील विविध संधी व महत्व' याविषयी मार्गदर्शन केले तसेच मुलींनाही करियर विषयी प्रेरणा दिली. अभ्यास करण्यासाठी आय.सी.टी. चा वापर वाढविण्याचा आग्रह या वेळी त्यांनी केला. विज्ञानाचा उत्कृष्ठ उपयोग करून संशोधनाच्या क्षेत्रात नाव कमावले आहे. म्हणुच विद्यार्थ्यांनीने आपण मुलगी असण्याचा न्यूनगंड बाजुला ठेवणे आवश्यक आहे असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना त्यांनी विज्ञानाप्रती प्रेरणादायी शब्दात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**- प्रा. ए.आय.शेख**
विज्ञान मंडळ प्रमुख

# Internal quality assurance cell (IQAC)

Internal Quality Assurance Cell (IQAC) is established in the college as per the guidelines of National Assessment and Accreditation council (NAAC). The IQAC is a part of the college system and it works towards realization of the goals of quality enhancement. The objective of IQAC are to develope a system for conscious consisted and catalatic action to improve the academic and administrative performance of the institution.

The college intends to face NAAC in the coming academic year. college has MOU (Memorandum of Understanding) with symbiosis International Deemed University Pune. SIU's expert professors are guiding the college According to criteria through NAAC parlamarsh sheme principle of the college Dr. T.M. Varat Sir had experience as a NAAC Co-Cordinator of New Arts Commerce and Science college, Ahmednagar under whose guidance the IQAC is functioning through the stand point that the college will get good rank of NAAC.

IQAC will facilitate or contribute to ensure high tended level of clarity and focus in institutional functioning towards quality enhancement. It also ensures internalization of the quality culture, it acts as a dynamic for Quality changes in higher education institution.

**Internal Quality Assurance cell**

| Sr.No. | Category | Name of the members |
|---|---|---|
| 1. | Special Invitees | 1) Hon. Dr. Narendra Ghule Patil (President J.S.P. Mandal, Dahigaon ne)<br>2) Hon. Shri Chandrashekhar Ghule Patil (Secretoary J.S.P. Mandal dahigaon ne) |
| 2. | Chairperson | Hon. Principle Dr. T.M. Varat |
| 3. | Teachers | 1) Prof. S.V. Markad 2) Prof. H.S. Sayyed 3) Prof. P.A. Phatangare<br>4) Prof. S.B. Dahatonde 5) Prof. A.I. Shaikh |
| 4. | Nominee from Local Society | Shri. Mahendra Dhamane President Alumni |
| 5. | Administrative officer | Shri. P.V. Dalvi |
| 6. | Co.ordinater | Prof. K. B. Take |

IQAC committee meetings are conducted twice in a year Academic activites which are carried out during the academic term as well as Preparation of the annual Quality Assurance Report (AQAR) as per guidelines of the NAAC were discussed in the meetings.

The co. ordinater of IQAC always communicate the objectives, aims of IQAC to all faculty members and keep documentation of various programs and activities carried out in the college He also collects feedback response from students, parents on quality related activities in the college.

**- Prof. K.B. Take**

# संशोधन समिती

विद्यापीठीय पातळीवर उच्च शिक्षणामध्ये संशोधनास अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. महाविद्यालयामध्ये संशोधन प्रक्रिया विकसित होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे मार्गदर्शनाखाली संशोधन समितीची स्थापना करण्यात आली. या समितीद्वारे महाविद्यालयातील प्राध्यापकांना संशोधनाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना संशोधन करण्यास प्रवृत्त केले जाते. यामध्ये त्यांनी लघुशोध प्रकल्प सादर करणे, एम.फिल अथवा पीएच.डी.साठी नोंदणी करणे, राज्य व देश पातळीवरील कार्यशाळा, चर्चासत्रे अथवा परिषदांमध्ये शोध निबंधाचे वाचन करणे याविषयी मार्गदर्शन केले जाते. तसेच विविध शोध पत्रिकेमध्ये प्राध्यापकांनी आपल्या विषयाचे शोध निबंध प्रकाशित करण्यासाठी ही संशोधन समिती कार्य करीत असते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. टी.एम. वराट यांचे अध्यक्षतेखाली नियमित सभा आयोजित करून प्राध्यापकांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच जे प्राध्यापक संशोधन कार्यशाळा, चर्चासत्र अथवा परिषदांमध्ये सहभागी झाले. त्यांना महाविद्यालयाच्यावतीने आर्थिक साहाय्य देण्यात आले. एकंदरीत संशोधन समितीने केलेले कार्य व महाविद्यालयाने दाखविलेला सकारात्मक दृष्टीकोन यामुळे संशोधन कार्यात वाढ झाल्याचे दिसून येते.

## संशोधन समिती

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ.टी.एम.वराट | संशोधन समिती प्रमुख |
| २ | प्रा. डॉ. के. आर. पिसाळ | सदस्य |
| ३ | प्रा. के. बी. ताके | सदस्य |

# माजी विद्यार्थी संघ अहवाल

दिनांक १ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे मार्गदर्शन प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी केले. गुरूवार दि. ७/३/२०१९ रोजी सहाय्यक संस्था निबंधक अहमदनगर यांच्याकडून संघाला अधिकृतरित्या संस्था नोंदणी प्रमाणपत्र नोंदणी क्रमांक **महाराष्ट्र २२१/२०१९ अहमदनगर मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयीन माजी विद्यार्थी संघ बोल्हेगांव, अहमदनगर** या नावाने मिळाले आहे. त्यानुसार माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली व ह्या संघातले पदाधिकारी खालीलप्रमाणे आहे.

**माजी विद्यार्थी संघ**

| | | |
|---|---|---|
| १) | अध्यक्ष | श्री. महेंद्र धामणे |
| २) | उपाध्यक्ष | श्री. सुजित ठोंबरे |
| ३) | सचिव | प्रा. एस.व्ही. मरकड |
| ४) | खजिनदार | प्रा.बी.एस.पवळे |
| ५) | सदस्य | श्री. अमोल भवार |
| ६) | सदस्या | वैशाली वाकचौरे |
| ७) | सदस्य | श्री. राकेश वाघ |
| ८) | सदस्य | श्री. किशोर धोत्रे |
| ९) | सदस्य | श्री. देठे स्वप्नील |

या विभागाअंतर्गत दरवर्षी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. माजी विद्यार्थी परिवार एकत्र येवून जुन्या आठवणींना उजाळा मिळावा, दूरावलेले मित्र या निमित्ताने एकत्र यावेत व आजी-माजी विद्यार्थ्यांमध्ये करिअर विषयक विचारांची देवाण-घेवाण व्हावी असा उपक्रमाचा उद्देश आहे. माजी विद्यार्थी व महाविद्यालया यांचा ऋणानुबंध कायम रहाव, महाविद्यालयाच्या विकासामध्ये त्यांनी मोलाच्या सूचना कराव्यात तसेच विविध माध्यमातून महाविद्यालयासाठी योगदान द्यावे, इत्यादी गोष्टीसाठी महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघाचे महत्व आहे. २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात माजी विद्यार्थी मेळाव्याबरोबरच दोन कॅम्पस मुलाखतीचे (Walk In Interview) आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले.

* ७ जुलै २०१९ रोजी आय.सी.आय.सी.आय (ICICI) बँकेमध्ये सेल्स अधिकारी म्हणून सर्व शाखेतील माजी विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी उपस्थित राहावे म्हणून संपर्क करण्यात आला. सदर मुलाखतीस ७२ माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कॅम्पस मुलाखतीचे ब्रँच मॅनेजर राजीव गोहर व हर्षल कुदळे यांनी विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा व मुलाखत घेऊन नऊ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना कोल्हापूर येथे ट्रेनिंगसाठी पाठवण्यात आले. सेल्स अधिकारी म्हणून माजी विद्यार्थी वाकाडे हर्षल, शिरसाठ अक्षय, गायकवाड वैभव, शर्मा आकाश, कांबळे कोमल, शेख मोसिन या विद्यार्थ्यांची निवड केली. या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील, संस्थेचे सचिनव

मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष नामदार सौ. राजश्रीताई घुले, पं.सं.सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री.के. वाय.नजन, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्रा.डॉ. आर.आर. सासवडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाकडून सत्कार करण्यात आला.

* दिनांक २७ जानेवारी २०२० कॅम्पस मुलाखत तसेच माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. ITM Edutech Pvt. Ltd. यांच्या विद्यामाने AXIS बँकेमध्ये BDE (Business Development Executive) d SALES OFFICER कैम्पस मुलाखतीचे (Walk In Interview) आयोजन करण्यात आले. या मुलाखतीस मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कॅम्पस मुलाखतीतून संगणकीय परीक्षा व मौखिक परीक्षेतून ११ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

* दिनांक २७ जानेवारी २०२० या दिवशी प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या अध्यक्षतेखाली माजी विद्यार्थी संघअध्यक्ष श्री. महेंद्र धामणे व उपाध्यक्ष सुजित ठोंबरे व माजी विद्यार्थी संघातील सदस्य यांच्या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी कॅम्पस मुलाखतीतून माजी विद्यार्थ्यांना या संघाच्या माध्यमातून एक व्यासपीठ तयार करण्यात आलेले आहे. यातून दर्जेदार शिक्षणाबरोबरच रोजगारासाठी सक्षम, स्वावलंबी व जबाबदारीने वागण्याची शिकवण दिली जाते. तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री. महेंद्र धामणे यांनी तृतीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचे माजी विद्यार्थी संघामध्ये स्वागत केले. व महाविद्यालयाच्या विकासासाठी विविध योजनांचे नियोजन करण्यात येईल असे माजी विद्यार्थी संघाच्या वतीने सांगितले.

**– प्रा. एस.व्ही. मरकड**
माजी विद्यार्थी संघ प्रमुख

# पर्यावरण विभाग

महाविद्यालयामध्ये पर्यावरण जाणीवजागृती हा विषय शिकविला जातो. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण व्हावी याविषयी माहिती दिली जाते. त्यामध्ये पर्यावरणाचा होणार असमतोल, जंगलतोड, जागतिक तापमान वाढ, दुष्काळ, महापूर, नैसर्गिक वादळे, बदलते हवामान, ग्रीन सिटी, वाढते नागरीकरण, इ. विषयी अध्ययन व अध्यापन केले जाते. पर्यावरण जाणीवजागृती हा विषय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून द्वितीय वर्षे कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक या वर्गासाठी अनिवार्य करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यामध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे हे पर्यावरण विषयाचे उद्दीष्ट आहे. पर्यावरणाचा शाश्वत विकास करून संरक्षण करणे हा मुख्य हेतू आहे. त्यासाठी महाविद्यालयामध्ये पर्यावरण जागृती व्हावी म्हणून पोस्टर प्रदर्शन हा उपक्रम घेण्यात आला. या मध्ये महाविद्यालयातील सुमारे १३३ विद्यार्थींनी सहभाग घेतला. प्रथम तीन विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी करण्यात आला आहे.

**–प्रा. एम.एल. कराळे**
पर्यावरण विभाग

# परीक्षा विभाग

परीक्षा विभाग हा महाविद्यालयातील एक महत्वाचा विभाग आहे. या विभागाचे कामकाज व्यवस्थित चालण्यासाठी परीक्षा समितीची स्थापना करण्यात आली आहे. वर्षभरात घेतल्या जामाऱ्या अंतर्गत परीक्षा, विद्यापीठ परीक्षा तसेच प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षांच्या नियोजनासाठी वर्षाच्या सुरुवातीपासून व वेळोवेळी सहविचार सभांचे आयोजन करण्यात येते. वरील सर्व परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत व विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानुसार घेतल्या जातात. वर्षाच्या सुरुवातीला वर्षभरात घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांचे वेळापत्रक तयार करण्यात येते. परीक्षा सुरक्षित व निकोप वातावरणात पार पाडता याव्यात यासाठी परीक्षा समितीतील सर्व सदस्य दक्षता घेतात.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी परीक्षा विभागाने प्रत्येक परीक्षेला महत्व दिले आहे. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. तसेच कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पडाव्यात यासाठी विभागाने विशेष काळजी घेतली आहे. परीक्षा विभाग सर्व सुविधांनी परिपुर्ण आहे. तसचे महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा आहे.

दि. ६ फेब्रुवारी २०२० रोजी पदवी ग्रहण समारंभाचे आयोजन करण्यात आले हा कार्यक्रम संस्थानिर्णयाच्या पातळीवर जिजामाता महाविद्यालय भेंडे येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांत ६४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री. देसाई साहेब होते. तर प्रमुख पाहुणे स्वा. रा. ती. म. विद्यापीठाचे माजी कुलगुरु मा.डॉ. पंडीत विद्यासागर होते. महाविदयालयाचे मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

चालु शै. वर्षात परीक्षेचे कामकाज चालु असताना कोरोना (कोव्हीड १९) या विषाणुजन्य संसर्गजन्य आजाराने जगभर थैमान घातले या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यापीठाने व शासनाने ठरवून दिलेल्या दिशा निर्देशानुसार परीक्षा विभागाने कामकाज पुर्ण केले आहे.

**– प्रा.पी. ए. फटांगरे**
परीक्षा विभाग प्रमुख




# शैक्षणिक सुविधांनी परीपूर्ण अहमदनगर शहरातील घुले पाटील महाविद्यालय

## विद्यार्थी वैयक्तिक विकासावर भर

◆ मारुतरावजी घुले पाटील कला,वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, स्वमालकीच्या सर्व सोयी सुविधेने परीपूर्ण इमारतीत अहमदनगर शहर परिसरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचे विश्वसनीय केंद्र म्हणून विकसित होत आहे. यासाठी महाविद्यालयात अध्ययन ,अध्यापनासाठी सर्व सुविधांची उपलब्धता आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.

**प्राचार्य - डॉ.टी.एम.वराट, मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय, अहमदनगर.**

भाविनिमगाव । जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक ,सहकार महर्षी लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या प्रेरणेतून अहमदनगर शहरातील बोल्हेगाव उपनगरात ( राघवेंद्र स्वामी मंदिर परीसरात ) मा.आमदार डॉ.नरेंद्र घुले पाटील व मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या दुरदृष्टीने व मार्गदर्शनातून मारुतरावजी घुले पाटील कला,वाणिज्य, शास्त्र व संगणक शास्त्र शाखा सर्व सोयी सुविधानियुक्त महाविद्यालय साकारले आहे. समाजातील दुर्बल,वंचित,गोरगरीब, कष्टकरी,आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील मुला-मुलींना उच्चशिक्षणाची सोय करून त्यांना स्वावलंबी, सक्षम, करणे हे या महाविद्यालयाचे उद्दिष्ट आणि ध्येय आहे. या विचाराला अनुसरून महाविद्यालयाची यशस्वीपणे वाटचाल सुरु आहे. सध्या जागतिकीकरण आणि स्पर्धेच्या युगात आजचा विद्यार्थी सर्व आव्हाने पेलण्यास समर्थ बनला पाहिजे या भूमिकेतून महाविद्यालयात सर्व भौतिक सोयी सुविधांसह गुणवत्ताधारक अध्यापक वर्गाची नेमणूक करून प्राचार्य डॉ.टी.एम.वराट यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा आज सर्वच क्षेत्रात प्रगतीचा आलेख उंचावला आहे.महाविद्यालयात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सक्षम व प्रभावी होण्यासाठी शैक्षणिक सुविधांसह शिक्षण पूरक अनेक उपक्रमांचे आयोजन वेळोवेळी महाविद्यालयात केले जाते. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय सेवा योजना, डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील,कमवा व शिका योजना,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, राज्यस्तरीय चर्चासत्र परिसरातील पालक,शेतकरी यांच्यासाठी मार्गदर्शक कार्यशाळेचे आयोजन,माजी विद्यार्थी मेळावा,पालक मेळावा, शैक्षणिक अभ्यासपूर्ण विभागीय सहली,क्रीडा स्पर्धा,तसेच महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करून वेगवेगळ्या कंपनी,बँका, यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाते. महाविद्यालयातील विविध विभाग,समित्या, मंडळे यांच्या विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्राप्त करून देण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय सेवक वर्ग सतत कार्यतत्पर आहे. कोविड 19 चा वाढता प्रभाव पाहता चालू शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे.विद्यार्थ्यांनी www.mgpcollege.com महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन फॉर्म भरून प्रवेश निश्चित करावा तसेच संगणक विभागामध्ये प्रवेशित जागा मर्यादित असल्याने आपला प्रवेश लवकरात लवकर करावा. महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सदैव सज्ज आहे. संस्थेचे सचिव मा. आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांचे महाविद्यालयाच्या उभारणीत मोलाचा वाटा असुन घुले कुटुंबीयांच्या देखरेखीत व मार्गदर्शनात महाविद्यालय दिवसेंदिवस प्रगती करत असुन उत्तुंग भरारी घेत आहे.

## महाविद्यालयातील उपलब्ध सुविधा-

◆ महाविद्यालयात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सक्षम व प्रभावी होण्यासाठी सुसज्ज वर्गखोल्या, समृद्ध ग्रंथालय, प्रशस्त क्रीडांगण, पार्किंग व्यवस्था, अद्यवत प्रयोगशाळा, वनस्पती शास्त्र उद्यान,तसेच संगणक शाखेसाठी सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, इंटरनेट आदी सुविधांसह महाविद्यालय परीसरात पर्यावरण पुरक व आकर्षक वृक्षराजीस प्राधान्य देण्यात आले आहे.


संकलन :- प्रा. श्रीराम व्ही. मरकड

प्रा. एस.व्ही. मरकड, प्रसिध्दी विभाग प्रमुख



# ।। पसायदान ।।

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१।।
जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२।।
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।४।।
चलां कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणींचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।५।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडीत ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।८।।
येथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाहला ।।९।।



महाविद्यालयात कॅम्पस मुलाखतीतून आय.सी.आय.सी.आय. (ICICI) बँकेमध्ये सेल्स अधिकारी म्हणुन कायम स्वरूपाच्या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल मा.प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. समवेत प्राध्यापकवृंद




शिवजयंती उत्सव २०१९ कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. नारायणराव म्हस्के, (इतिहास विभाग प्रमुख, भेंडे) शिव व्याख्याते प्रा. संतोष वीरकर, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, डॉ. एच.एम. तनपुरे, प्रा. एस.व्ही. मरकड (इतिहास विभाग प्रमुख) व महाविद्यालयातील विद्यार्थी

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

- आधुनिक भव्य व सुसज्ज इमारत
- अनुभवी व उच्चशिक्षित प्राध्यापकवृंद
- समृद्ध ग्रंथालय व अभ्यासिका
- अद्ययावत स्वतंत्र प्रयोगशाळा कक्ष
- इंटरनेट सुविधा व अद्ययावत संगणक कक्ष
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- प्रशस्त क्रीडांगण व वाहनतळ सुविधा
- राष्ट्रीय सेवा योजना
- विद्यार्थी समुपदेशन केंद्र
- महिला तक्रार निवारण समिती
- उत्कृष्ट निकालाची परंपरा
- कॅम्पस मुलाखतीचे आयोजन
- बहि:शाल शिक्षण केंद्र
- विद्यार्थी विकास मंडळ
- गुणवत्ता सुधार योजना
- विद्यार्थी विमा योजना
- विविध सांस्कृतिक उपक्रम
- विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट सुविधा
- शैक्षणिक सहलींचे आयोजन
- डॉ.क.भा.पाटील कमवा व शिका योजना
- विविध विषयाच्या चर्चासत्रांचे आयोजन
- वनस्पतीशास्त्र गार्डन
- अनुकूल व आनंददायी शैक्षणिक वातावरण
- माजी विद्यार्थी संघ




जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने संचलित

**मारुतरावजी घुले पाटील कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर**

श्री राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव रोड, अहमदनगर - ४१४ १११.

Online College Code No. C02430 ID No. PU/AN/ACS/111/2009 College Code No. 893 Pun. Code-CAAA017120

फोन : ०२४१-२७७९४९७, Email : mgpcollege@gmail.com/website : www.mgpcollege.com